छात्र प्रबोधन

सौर फाल्गुन, शके १९३३
वर्ष १२ अंक ६
मूल्य रुपये पंधरा

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक !

रेषासंवाद

चित्र : खलील खान

स्थिर चित्र (Still life) : **चित्रा वैद्य, संदर्भ** : अंकातील लेख – ‘चित्रगोष्टी’

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

छात्र प्रबोधन

सौर फाल्गुन, शके १९३३। वर्ष १२ अंक ६

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२) २३६ वा अंक, वर्ष २० अंक ८

प्रकाशन दिनांक - ११ फाल्गुन, शके १९३३/१ मार्च २०१२

• अंतरंग •

२. **संवाद** - महेन्द्र सेठिया

३. कथा... **क्लासपंथे न जावे !** - हरिहर आठलेकर

८. कविता... **परीक्षा हॉलमधल्या काही कविता** - नामदेव कोळी

९. माहितीपर... **अस्वस्थ म्यानमारमधील शांतिदूत आँग सान स्यू ची** - शैलजा देशमुख

१४. चित्रगोष्टी...४ **स्थिरचित्र - १** - चित्रा वैद्य

१६. कविता... **रंगात रंग तरंग** - आश्लेषा महाजन

१८. माहितीपर... **भारताचा पहिला अंतराळवीर राकेश शर्मा** - डॉ. निवास पाटील

२१. उजळती वाट...**- ५** **स्वाध्याय प्रवचन** - डॉ. स्वर्णलता भिशीकर

२५. **प्लीज समजून घ्या नं मला** - नमित चित्रे

२६. कथा... **नवा दोस्त** - कमल राजाज्ञा

२९. माहितीपर... **महाराष्ट्राची साहित्य पंढरी : महाराष्ट्र साहित्य परिषद** - प्रा. मिलिंद जोशी

याशिवाय - काही नवे लक्षवेधी..., मुखपृष्ठ चित्रकार (२४),चित्रकार परिचय (३१), 'क्लिक' करण्यापूर्वी-२, ...वाचाल तर वाचाल... (३२)

पद्य... भारत माता एकच दैवत (मलपृष्ठाच्या आतील पानावर) - रामभाऊ डिंबळे

या अंकातील पानांखालील काव्यपंक्ती कवयित्री डॉ. सुमन नवलकर यांच्या आहेत.

संपादक, प्रकाशक, मुद्रक
महेन्द्र सेठिया
कार्यकारी संपादक
जयश्री काटीकर
संपादक मंडळ
शैलजा देशमुख, नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे, आश्लेषा महाजन
मुखपृष्ठ
भास्कर सगर
मलपृष्ठ प्रकाशचित्र - नकुल
आतील चित्रे
अभय पुरंदरे, साहिल उपळेकर,
कुडल हिरेमठ,ओंकार इनामदार

मुखपृष्ठाविषयी

मुखपृष्ठावरील चित्र हर्णे बंदरावरील आहे. कोळी आपली बोट समुद्रात लोटत आहेत, असे या चित्रात दाखवले आहे. हे चित्र प्रवाही जलरंग माध्यमात रंगवलेले असून, कमीत कमी वेळात चित्रित केले आहे. निळ्या रंगामुळे समुद्राची गहनता, अथांगपणा, शीतलता जाणवते. म्हणून या चित्रात निळ्या रंगाचा जास्तीत जास्त वापर केला आहे.

भास्कर सगर

संपर्क पत्ता
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९
ई-मेल / संकेतस्थळ :
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
www.chhatraprabodhan.org

छात्र प्रबोधन मासिकाची वर्गणी
वार्षिक : ₹ १८०/ द्वैवार्षिक : ₹ ३४०/
त्रैवार्षिक : ₹ ५००/दशवार्षिक : ₹ १,५००/

या अंकाची किंमत : ₹ १५/-
पुण्याबाहेरील धनादेशासाठी - ₹ २०/- जादा
घरपोच दिवाळी अंकासाठी- प्रतिवर्षी ₹ ४०/- जादा

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

संवाद

असीम शक्ती असलेल्या सिंहासारख्या शूर प्रबोधकांनो,

'संवाद'मध्ये चित्र पाहून आश्चर्य वाटलं ना? खूप दिवसांपासून या चित्राबाबत तुमच्याशी बोलावं असं वाटत होतं. तुम्हाला हे चित्र पाहून काय वाटलं? पुढचं वाचण्यापूर्वी जरा विचार करा. तुमच्या घरातल्या इतरांना, मित्रमैत्रिणींना हे चित्र दाखवा. त्यांना काय वाटतंय ते समजून घ्या.

चित्राचं वर्णन करायचं म्हटलं तर एक मांजर आरशात पाहाते आहे आणि आरशात मांजराला सिंहाचा चेहरा दिसतो आहे. भौतिकशास्त्राच्या नियमानुसार हे शक्य नाही. मांजरीला आरशात स्वत:चीच प्रतिमा दिसायला हवी; पण मग चित्रकाराला काय सुचवायचं असेल? या चित्राच्या खाली एक फार छान वाक्य लिहिलं होतं, "What matters most is how you see yourself." काय याचा अर्थ? तुम्ही स्वत:ला कसे पाहाता, कोण समजता, हे जगात सर्वात महत्त्वाचं असतं. मी काळा, मी बुटका, मला साधी एखादी गोष्ट सांगायची तरी ते जमत नाही. मला कधीच यशस्वी होता येणार नाही, अशी तुम्ही तुमची प्रतिमा तुमच्या मनाच्या आरशात निर्माण केलीत, तर तुम्हाला सिंहाच्याऐवजी आरशात उंदीरच दिसणार! शरीराच्या ज्या वैशिष्ट्यांसह आपण जन्मलो ते फारसे बदलता येणार नाहीत; पण त्या पलीकडे मनाच्या अन् बुद्धीच्या प्रचंड क्षमता आपल्या प्रत्येकामध्ये दडलेल्या आहेत. त्या आपण फारशा कधी ओळखलेल्याच नसतात. मग आपण फक्त बाह्य रंग-रूपावरूनच स्वत:ची प्रतिमा तयार करत जातो. किंवा काही वेळेला इतरांना आपल्याबद्दल काय वाटतंय, आपल्याबद्दल कोण काय म्हणतंय, इतरांकडच्या आरशात आपण कसे दिसतो यावरच आपण कोण आहोत, कसे आहोत हे शोधत असतो. इतर काय म्हणतात त्यापेक्षा आपण आपल्या आरशात कसे दिसतो हे पाहायचा प्रयत्न करा. आता कदाचित तुमची प्रतिमा तुम्हाला फारशी आवडली नसेलही! कारण आळस, स्वभावातील चुकीच्या गोष्टी, चुकीच्या सवयी इ. मुळे तुमच्या आतमध्ये दडलेल्या प्रचंड शक्तीवर काजळी आली असणार आहे. ती दूर करायचा प्रयत्न केलात की, तुम्हाला तुमच्या खऱ्या, अमर्याद शक्तीची कल्पना यायला लागेल. मग तुम्ही म्हणाल, 'कंदिलावरची काजळी कपड्याने पुसून काढून टाकता येते. पण ही मनावरची धूळ, काजळी काढून टाकायला कोणते कापड वापरायचे?' ठरवून हळूहळू आळस कमी करणे, चांगल्या सवयी लावून घेणे, स्वत:ची निश्चयशक्ती, जिद्द वाढवणे, मोठं काहीतरी करण्याची इच्छा मनात बाळगणे, थोड्या आवाक्याबाहेर वाटणाऱ्या गोष्टी करण्यासाठी स्वत:च्या क्षमता ताणणे, अधिकाधिक जणांच्या उपयोगी पडण्यासाठी धडपडणे इ. गोष्टी कराव्या लागतात. अशा प्रकारचे यशस्वी आयुष्य जगलेल्यांची चरित्रे तुम्ही जरूर वाचा, ऐका. इतरांशी तुलना करायचे टाळून अनेक प्रकारचे अनुभव घेत ज्यात तुम्ही 'सिंहासारखे' राजे असाल, असे स्वत:चे 'जंगल' (क्षेत्र) शोधायचा प्रयत्न करा. आहोत तेथून पुढे जाण्यासाठी स्वत:हून आव्हानांना सामोरं जायचं. म्हणजे मग खऱ्या अर्थाने आपण 'सिंह' आहोत याची तुम्हाला जाणीव होईल.

स्वामी विवेकानंद म्हणतात, 'आपल्यापैकी प्रत्येकात देवत्वाचे अंश आहेत'. त्या देवत्वाला ओळखण्यासाठीच तर 'रोजची उपासना' करायची. ते चित्र आता पुन्हा एकदा पाहा आणि त्या मांजरीच्या जागेवर तुम्ही आहात अशी कल्पना करा. तुम्ही स्वत:ला सिंहासारखे पाहू शकाल का? (निव्वळ फाजील आत्मविश्वास किंवा घमेंड किंवा फुकाच्या गर्विष्ठपणातून नव्हे बरं का), तर खरंखरं आतून तुम्हाला तसं जाणवायला लागलंय का? अशीच शक्ती असलेल्या मूळ स्वभावाच्या दिशेने रोज दोन-चार पावले टाकायला लागलात आणि आपण देवत्वाचे अंश आहोत यावर मनापासून श्रद्धा ठेवलीत तर तुम्ही नक्की तसे व्हाल. त्या दिशेने चार पावले टाकायचा मीही प्रयत्न करतोय. तुम्हा सर्वांनाही ते जमावं यासाठीच तर 'छात्र प्रबोधन' आहे.

'कॉपी' न करता दिलेल्या वार्षिक परीक्षेतील उत्तुंग यशासाठी आणि गुढीपाडव्यापासून सुरू होणाऱ्या 'नंदन' नावाच्या नूतन संवत्सरासाठी (वर्षासाठी) तुम्हा सर्वांना खूप खूप शुभेच्छा!

सस्नेह तुमचा,

(महेन्द्र सेठिया)

अक्षरवेलीवरती फुलून आला ज्ञानफुलोरा। अज्ञानाच्या अंधाराने केला बघ पोबारा।।

प्रायोजक - शंतनू पटवर्धन, टेक्सास अमेरिका

क्लासपंथे न जावे!

हरिहर आठलेकर

पाटील विद्यालयाच्या दहावीच्या दोन्ही तुकड्यांना एकत्र करून केंद्र परीक्षेचे फॉर्मस् भरण्याची क्रिया सुरू होती. सगळ्यांचे फॉर्मस् भरून झाले तसे वर्गशिक्षक असलेल्या अण्णा मास्तरांनी सगळ्या विद्यार्थ्यांना सांगितलं,

''हे बघा, फॉर्म-फी आणि इतर सर्व वर्गण्यांचे मिळून साडेचारशे रुपये होतात. ती रक्कम ३० सप्टेंबरपूर्वी माझ्याकडे जमा व्हायला हवी. जे ही रक्कम जमा करणार नाहीत त्यांचे फॉर्मस् बोर्डाकडे पाठवले जाणार नाहीत, म्हणजे त्यांना परीक्षेला बसता येणार नाही.''

अण्णा मास्तरांनी जाहीर केलं आणि सगळे विद्यार्थी बाहेर पडले. जया खोबरेकर आणि मुक्या पटनायक थोडे उदाससे विचारात गढलेले असेच बाहेर आले. फाटकाबाहेर मोठं पार बांधलेलं ओवळीचं (बकुळीचं) झाड होतं. जुनाट आणि डेरेदार! शाळेतली मुलं इथं अभ्यासालाही बसत.

''काय रे जया, आता काय करायचं? एवढ्यात काही रापणी (मासेमारी) पडणार नाहीत. बाबांनी माझ्या परीक्षाशुल्कासाठी वेगळे पाचशे रुपये बाजूला ठेवले होते. पण परवा आईला दवाखान्यात न्यावं लागलं आणि ते पैसे संपले. पेचच आहे.'' मुकुंद पटनायक म्हणाला.

''खरं सांगू मुक्या, मला वाटतं अण्णा मास्तर आपल्यावर डूक धरून आहेत. ते निमित्तच पाहतायत.''

''खरंय रे, त्यांच्या क्लासला गेलो नाही ना तो डूक आहेच.''

''शिवाय मागच्या चाचणी परीक्षेत त्यांनी आपल्याला जाणून बुजून गुण कमी दिले. आपण तक्रार केली आणि मुख्याध्यापक सरांनी आपल्या उत्तरपत्रिका तपासून घेतल्या. तेव्हा आपल्या दोघांच्याही गुणांत वाढ झाली. तोही डूक असणारच.''

''पण आता काय करायचं? रापणी तर पडलेल्या नाहीत. पंधरा दिवस नुसता पाऊस आणि वारा. खाडीतदेखील कोणी पागणीला जात नाहीत. आज २५ तारीख. ३० तारखेला फक्त चार दिवस आहेत मध्ये. साडेचारशे रुपये कसे उभे करायचे?...''

''हो ना, जाऊन अण्णामास्तरांशी बोलावं असंही वाटत नाहीये. त्यांनीच थोडी सवलत दिली तर? पण नकोच. पाहूया काय करायचं ते.''

जया विचारात गढून गेला.

***

हनुमंत राघोबा सामंत गावातल्याच शाळेत शिक्षक म्हणून राहिले होते. गावात शेती-बागायती होती. गावात त्यांना अण्णा मास्तर म्हणून ओळखीत. शाळेत मुलं 'सर' म्हणत पण बाहेर उल्लेख 'अण्णा मास्तर' असाच करीत.

अण्णा मास्तर परीक्षेपूर्वी चार महिने परीक्षेच्या तयारीसाठी आपल्या घरी खास वर्ग घेत. दहावीची मुलं परीक्षेला गेली की ते नववीचा वर्ग एक-दीड महिना घेत. त्या वर्गाची फी असे एक हजार रुपये. तर दहावीची अडीच हजार रुपये फी घेत. त्या वर्गात ते नवीन काही शिकवीत नसत, पण प्रश्नपत्रिकांचा सराव करून घेत. जयवंत खोबरेकर हुशार होता. गेल्या वर्षी तो नववीत असताना त्याच्या काकांनी खास वर्गाचे पैसे भरले होते. त्यामुळं त्याला त्या वर्गाची ओळख झाली होती. तंत्रही समजलं होतं. या वर्षी ऑक्टोबर महिन्यात दोन तारखेला सुरू करायच्या वर्गासाठी अण्णा मास्तरांनी सप्टेंबरातच नावनोंदणी सुरू केली होती. अण्णा मास्तरांची अटकळ होती; यावर्षी पन्नास मुलं नावं नोंदवतील.

***

तो गाव, बाजार भरणारा असला तरी जमीनदार, व्यापारी काही नोकरपेशांची बिऱ्हाडं सोडली तर एक रकमी हजारभर रुपये जमा करण्याची क्षमता कोणाचीच नव्हती. पण अण्णा मास्तर वर्ग घेतात म्हणून आपली मुलं पास होतात. ही पालकांची समजूत. हर प्रयत्न करून पालक मुलांना वर्गाला पाठवीत.

या वर्षी आश्लेषा, मघा, पूर्वा या तिन्ही नक्षत्रांत पाऊस सतत पडला. सोबत वादळवारे आणि खवळलेला समुद्र. शेतकऱ्यांनी लावणी केलेली भातं पुरानं आडवी झाली. पीक किती हातात येईल या चिंतेत शेतकरी. खाडीकाठचे मच्छिमार मासेमारी ठप्प म्हणून चिंतेत. अण्णा मास्तरांच्या वर्गात नाव कसं नोंदवायचं या काळजीत असलेली मुलं अशीच पारावर जमली होती. एकाच्या संगतीत दुसरा अशी ती दहा-बारा मुलं होती. त्यात जया खोबरेकर जरा जास्त अनुभवी, बोलका आणि घरचे वेगळे संस्कार असलेला होता. त्याचा आजा गोविंदा दर वर्षी पायी पंढरपूर यात्रा करी. 'दासबोध', 'रामविजय' असे ग्रंथ वाची. त्या ग्रंथांचं लोकांना समजेल असं निरूपणही करी.

***

अण्णा मास्तरांनी खास शिकवणीच्या वर्गाचा कार्यक्रम जाहीर केला तेव्हा त्याच रात्री आजासमोरच फी साठी दोन हजार रुपयांची मागणी जयाने केली.

''आमी काय शिकलों नाय काय रे जया? हो तुज्यो बापूस इंग्रजी चवथीतून घरी ऱ्हवलो. ते वर्साक तेका तारवावर (जहाजावर) जावचां लागलां. मी सातवेतसून शाळा सोडली. माजो बाबा खूप शीक (आजारी) होतो, तेव्हा तीन तारवांचा कारभार बघणारे दुसरो कोण न्हवतो. मी शाळा सोडली नि...''

''पण आजा -''

''काय्येक सांगा नको, बुकां हत ना सगळी? वाचा नि अभ्यास करा. मी बघतंय कोण कशे नापास होतंत ते!''

***

तिथूनच मुलामुलांत कुजबूज सुरू झाली. आणि एक दिवस शाळेसमोरच्या त्या बकुळवृक्षाच्या साक्षीनं पारावरच त्या अणि शेजारच्या वस्तीतल्या मिळून सोळा मुलांनी निर्णय घेतला की, 'अण्णा मास्तरांच्या क्लासला जायचं नाही. पुस्तकं घेऊन एकत्रित अभ्यास करायचा.' त्यात काही शेतकऱ्यांचीही मुलं होती. त्या तुकडीतले सोळा परीक्षार्थी स्पेशल क्लासला येणार नाहीत हे पक्कं झालं आणि अण्णा मास्तर मनातून नाराज झाले. म्हणूनच त्यांनी फॉर्म फी भरण्याचा तगादा लावला होता. आणि जे फॉर्म फी देणार नाहीत त्यांचे फॉर्म पाठवायचे नाहीत, हेही त्यांनी मनाशी पक्कं केलं होतं. कुणाचं काही ऐकून घ्यायलाही ते तयार नव्हते.

***

शाळा सुटल्यावार जया, मुक्या आणि परबांचे दोघे घाटी चढून कातळावर आले आणि दुसऱ्या घाटीनं खाडीकाठी उतरले. खाडीतलं पाणी निवळलं होतं. सगळेच मित्र चिंतेत होते. तीस तारखेपर्यंत फॉर्म फीचे पैसे कसे गोळा करायचे हा यक्षप्रश्न त्यांच्यापुढे होता. उधारीवर, सावकाराकडून घेऊन पोरांना पैसे द्यायला घरचेही फारसे उत्सुक नव्हते.

। अभिनंदन...ज्येष्ठ प्रयोगशील लेखक, दिग्दर्शक व अभिनेते गिरीश जोशी- तन्वीर नाट्यधर्मी पुरस्कार।
। कै. प्रभाकर बळवंत करंदीकर स्मरणार्थ। **प्रायोजक – श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे**

''जया, आम्ही मासे धरूया काय रे?'' परभ्या परबानं विचारलं.

''कुठं? गळ टाकून असे कितीसे मासे मिळतील?''

''तसं नव्हं. आपण भटातल्या कोंडीत पागणीला जाऊया. अजून कोणी गेले नाही आहेत तिकडे. आपण गेलो तर भरती झाल्या झाल्या मोठे मासे मिळतील. निदान एकाची किंवा दोघांची तरी गरज भागेल म्हणतो. बघूया तरी...''

''असं म्हणतोस? बघूयाच तर!'' जया म्हणाला, ''मुक्या चल, आपण पागणीची जाळी आणूया. तुम्ही दोघेही वेळेवर जा. वरच्या खोपटाशी आमच्या दोन पागणीच्या होड्या आहेत वर काढलेल्या. हौरामुळं (पुरामुळं) त्या वरच्या खोपीकडे आणाव्या लागल्या. होडी उताणी केलीत की आधी नाळ पिड्यावर (झापाचा मागचा देठ) ठेवा. पिड्यांवरून होड्या लोटायला हलक्या येतील. तोपर्यंत आम्ही दोन वल्हेही घेऊन येतो. चला.''

मनात यायची खोटी; चौघेही लगेच उत्साहानं कामाला लागले. भटातली कोंड (डोह) ही त्या भागातली विशेष कोंड होती. डोंगराचा पंचवीसेक मीटरचा कुपीच्या दगडांचा (गारेचा पांढरा दगड) कडा पाण्यातच होता. शेकडो वर्षं पाण्याला घासून त्या दगडांचे आकार दुरून माणसांसारखे दिसत; जसे कोणी तपश्चर्येला बसलेले ब्राह्मणच! कोकणात ब्राह्मणांना भट म्हणतात. म्हणून ती भटातली कोंड. त्या कोंडीच्या वरच्या टोकाला पेंड (प्रवाहाच्या आडवं लावलेलं जाळं) लावली की सकाळी काही मासे मिळत. हे जाळं समेवर (भरती पूर्ण होऊन पाणी थाबतं ती समा म्हणतात) पाणी आलं की लावतात.

परभ्या परब आणि गुण्या परब शेतकरीच. पण कधी कधी कोणाच्या तरी बदली रापण ओढायला जात असत. त्या दोघांनी खोपीत आपले कपडे-पुस्तकं ठेवली आणि होड्या पाण्यापर्यंत नेल्या. तोवर जया आणि मुक्या जाळी घेऊन खाली आले.

आता अगदी अखेरची सुकती (ओहोटी) होती. एका होडीत जया खोबरेकर आणि परभ्या परब चढले. दुसऱ्या होडीत मुक्या पटनायक आणि गुण्या परब चढले. पूर नुकताच ओसरलेला. ओहोटीमुळं दोन्ही होड्या धारेलाच लागल्या. तिथून भटातली कोंड पाऊण मैल खालच्या अंगाला होती. परभ्या आणि गुण्या दोघेही सुकाणूवर बसले. जया आणि मुक्या दोघेही नाळावर उभं राहून माशांचा अंदाज घेऊ लागले.

आज त्यांचं नशीब जोरावर होतं. काळ्या पाठीचे वाटू, तांबोशी, मोठे दोन गुंजे आणि टोकी गुंजुले असे लहान मोठे मिळून चाळीसेक नग तासाभरातच जमा झाले. तेवढ्यात भरतीनं जोर केला तसे ते वस्तीवर परतले. किनाऱ्याला होड्या टेकल्या तसा खोपीकडून जयाचा आजा गोविंदा धावत खाली आला. म्हणाला,

''खंय गेल्लात पोरग्यानु होडये घेवन? पागणेची जाळी खंय आसत?''

''आजा ही काय जाळी? आम्ही भटातल्या थोरल्या कोंडीत पागून आलो.''

''म्हणतास काय? तुम्ही पोरगे पोरगे येकलेच गेला? काय जाला आसता तर? पण इतक्या करून आणलांत काय?''

''हे बघ आजा. यातून आमची चौघांचीही फॉर्म फी भागेलसं वाटतं.'' असं म्हणत दोघांनी दोन झाबळ्या दाखवल्या.

''अरे!'' गोविंदा आ वासून आश्चर्यानं पाहातच राहिला. मग सावकाश म्हणाला,

''कमाल केलास पोरग्यांनु! पण येक सांगतंय, पुन्ना कधी अशे खयल्या जाणत्या माणसाक बरोबर घेतल्याखेरीज भटातल्या कोंडीत जाव नको. एकदा गेलास ते गेलास. देवाच्या किरपेन तुमचां कामय झालां.''

''पण आजा आम्हाला प्रत्येकाला साडेचारशे रुपये परवापर्यंत भरायलाच हवेत.''

''काय घेवन बसलात. सोमते जावया बाजारात. मी येतंय सायकल घेवन तुमच्यावांगडा (तुमच्याबरोबर). तुमचे सायकली घेया नि तुमी पण येया. थयच तुमका पैशे देवक लायतंय.''

तसं ते ओझं सायकलींना लावून अर्ध्या तासातच बाजारात पोचले सगळे. फार वेळ लागलाच नाही. आधी गणपतीमुळं आणि नंतर अडाणी पावसामुळं पंधरा दिवस बाजारात मासे किरकोळीनंच येत. मासळीविक्रीच्या कट्ट्यावर एका टोपलीत गोविंदानं दोन्ही झाबळ्या ओतल्या आणि झुंबड उडाली. चार मोठे नग दोनशे-तीनशे रुपयांची कमाई देऊन गेले. काही असो, चौघांची फॉर्म फी आरामात भरली जाणार होती.

''फॉर्म फी झाली आता अभ्यासाचं काय?'' अण्णा मास्तरांनी विचारलं,''महिन्याभरानं उशिरा फी भरा. पण वर्गात या.''

''बघतो, आजाला विचारतो...'' जया म्हणाला आणि गप्प राहिला.

***

वस्तीतल्या लोकांचं एक कुळाचं (कुलपुरुषाचं) देऊळ होतं. त्या देवळात भजनं होत आणि वस्तीतल्या लोकांचे मेळे भरत. न्याय-निवाडेही तिथंच होत. रिकाम्यावेळी तिथंच खांबाला टांगणी लावून जाळी विणण्याचंही काम चाले. त्या देवळीत विजेच्या दिव्यांचीही सोय होती. जयानं आपल्या एका चुलत काकाला पत्र पाठवून सगळ्या विषयांच्या प्रश्नपत्रिका पाठवायला सांगितल्या. त्या देवळात कुलपुरुषाच्या साक्षीनं अभ्यास सुरू झाला. खरंतर सगळ्यांकडे पुस्तकंही नव्हती. जयानं तोड काढली.

''बघा, एक महिना आपण सगळी पुस्तकं वाचायची चारा-चारांचे गट करून. एकानं वाचायचं इतर तिघांनी नीट ऐकायचं. ऐकलेल्या विषयाची नेमकी उत्तरं येतील असे प्रश्न ऐकणाऱ्यांनी लिहायचे. रात्री सात वाजता इथं यायचं आणि दहा साडेदहापर्यंत बसायचं.''

तशी ती मुलं मूळची बुद्धू नव्हतीच. आकलन होत होतं. पुस्तकं वाचून झाली तशा प्रश्नपत्रिका सोडवायला घेतल्या. पाठ्यपुस्तकाच्या साहाय्यानं आपापल्या उत्तरपत्रिका तपासून गुण

। दिनविशेष... ८ मार्च - आंतरराष्ट्रीय महिला दिन।

प्रायोजक – श्री. निखिल रामचंद्र कात्रे, डोंबिवली

पाहिले. मग तीन तासाची किंवा दीड तासाची पत्रिका घेऊन तेवढ्याच वेळात उत्तरं लिहून तपासली.

मोबारवाडीतल्या देवळीत जयाबरोबर अभ्यासाला बसतात ती मुलं क्लासला गेली नाहीत. लगतच्या खेड्यांतून चारसहा मैलांवरून येणारी मुलंही दहावीत होती. ती सर्व कुठं क्लासला जात होती? जया आणि कंपनीचं पाहून ती मुलंही प्रश्नपत्रिका सोडवायला जयाकडून मागून नेऊ लागली. जया त्यांना सांगे,

''पुस्तकं न उघडता प्रश्नपत्रिका घड्याळ लावून सोडवा. मग पुस्तकं घेऊन आपली उत्तरं तपासा. मग आपोआपच कळेल की कुठं आपण कमी पडतो ते. मात्र प्रश्नपत्रिका सोडवून झाली की लगेच माझ्याकडे आणून द्या.''

अ आणि ब तुकड्यांचे गट शाळेत नेहमीच असायचे. पण आता वेगळे दोन गट तयार झाले. खास शिकवणीला जाणारे आणि शिकवणीला न जाता अभ्यास करणारे. मुख्याध्यापकांनी स्वत: परीक्षेच्या आधी पंधरा दिवस एक व्याख्यानमाला ठेवली. तालुक्यातील त्या त्या विषयातील तज्ज्ञ शिक्षक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करीत. शाहत्तर मुलांचा सगळा वर्ग त्यात सामील झाला. त्यातलेच एक हुशार शिक्षक मुख्याध्यापकांना म्हणाले,

''मुलांचा एक गट आहे बघा; मागच्या दोन रांगांत ही मुलं बसतात. वेगळीच आहेत ही मुलं. प्रश्नोत्तरांना चांगली साथ तीच देतात. शंका विचारतात त्याही त्यांच्या मार्मिक असतात. त्यांच्यासाठी खास वर्ग वगैरे आहे काय?''

''खास वर्ग कुठला? यंदा पावसामुळं आणि पुरामुळं फॉर्म फी भरणंसुद्धा कठीण होतं! पण ती मुलं मोबारवाडीत देवळीत बसून स्वत: अभ्यास करतात. त्यांच्यामुळं अण्णांच्या खास वर्गाला यंदा गळती लागलीय. परीक्षा होऊ दे. बघू परिणाम काय होतो....''

''होईल तो चांगलाच होईल. ती मुलं पुस्तकं वाचून अभ्यास करतात, असं दिसलं मला. पाठ्यपुस्तकांना आधार धरून प्रश्नपत्रिकांचं सेटिंग झालं असेल तर ही मुलं नक्की बाजी मारणार.''

***

परीक्षा देऊन मुलं मोकळी झाली. पालक म्हणत होते यंदा आपल्या मुलांना क्लासला पाठवणं जमलं नाही. कसं होणार त्यांचं? त्यांना निकालाची धाकधूक होती. दर वर्षी क्लासला जाणारी मुलं सगळीच पास होत. तेव्हा पालकांची ही शंका रास्त होती. पालकांना परीक्षा संपलेल्या मुलांची मदत शेतीच्या उन्हाळी कामांना, काजू- आंब्याच्या बागांतूनही मोकळेपणानं मिळाली होती. मुलांच्या मनात निकालाबद्दल धाकधुक असली तरी उत्सुकता होतीच.

***

जून अर्धा मागं गेला आणि टी.व्ही., रेडिओ आणि दैनिकांतून दहावीच्या निकालाचा दिवस जाहीर झाला. ठरल्या दिवशी शाळांवर निकाल पोचलाही. त्या विद्यालयाचे मुख्याध्यापक केंद्र संचालक होते. त्यांनी तो निकाल पाहिला आणि ते चकित झाले. त्यांच्याच विद्यालयातला जयवंत खोबरेकर केंद्रात आणि ओघानं विद्यालयात पहिला होता. मुकुंद पटनायक हा तिसरा होता. त्या केंद्रातील दहा मुलांत त्या विद्यालयाचे आणखी तीन विद्यार्थी होते. मोबारवाडीतील आणि माळेवाडीतली सगळी मुलं पास झाली होती. त्यातला कोणीही कोणत्याही खास वर्गात दाखल झाला नव्हता. उलट क्लासला जाणाऱ्या सहा मुलांनी त्या परीक्षेत आपटी खाल्ली होती.

''हे कसं घडलं?'' मुख्याध्यापकांना आनंद तर झालाच. शिवाय क्लासला न जाणाऱ्या गटाविषयीचं कौतुक त्यांच्या डोळ्यांत तरळलं. या सगळ्यांचं आणि सगळ्या पोरांना 'जयवंत' आधार देणाऱ्या जयाचं कौतुक जाहीरपणे करायचं हे मनोमन ठरवूनच ते स्टाफसभेकडे वळले.

♣♣

हरिहर आठलेकर
२९३/सी, भटवाडी,
सावंतवाडी
जि. सिंधुदुर्ग 416 510

परीक्षा हॉलमधल्या काही कविता

परीक्षा हॉलमधल्या सजीव वस्तू:
पेन, पेन्सिल, पट्टी, बेंच, पंखा,
कागद, शाई, ओळी... भिंत-खिडकी
परीक्षा हॉलमधल्या निर्जीव वस्तू:
विद्यार्थी, शिक्षक ।।

✻ ✻

मनाचा आटापीटा करून
डोक्यात नसलेलं लिहित राहिलो
घण्टा झाली... पेपर पुरेसा भरला...
वेळ तेवढी पेपरमध्ये मावली नाही...! ।।

✻ ✻



तीन तासांच्या
कैदेतून सूटल्याचा भास...
पेपर देऊन
निघताना...!! ।।

✻ ✻

अक्षरांचा सोहळा
साजरा होतोय दोन्ही हातांनी वर्गात
वेळ पुरला नाही... इतरांची कुणकुण...
भरपूर वेळ शिल्लक असतो माझ्याकडे,
पेपर मात्र कोराच ! ।।

✻ ✻

विषयाच्या आवडीनुसार
व्हावी परीक्षा ही आवडीची...
एक-एक संपवताना पेपर
वेळ कशाला पहावी निकालाची? ।।

✻ ✻

– **नामदेव कोळी,** मु. पो. कडगाव, ता. जि. जळगाव 424125

। आदरांजली - ज्येष्ठ संगीतकार- अनिल मोहिले - १ फेब्रुवारी २०१२।
। डोळस व्हा आणि हिंमतीने पुढे चला !। **प्रायोजक – डॉ. सतिशचंद्र गोरे, पुणे**

अस्वस्थ म्यानमारमधील शांतिदूत आँग सान स्यू ची

– शैलजा देशमुख

जगातले शांतता आणि सामंजस्याचे सर्वाधिक पुरस्कार मिळालेली; महात्मा गांधींच्या अहिंसा, सत्याग्रह आणि निर्भयता या तत्त्वांचा मार्ग अनुसरून ब्रह्मदेशातल्या लोकशाही लढ्याचे नेतृत्व करणारी, त्यासाठी राजकीय बंदिवासात सर्वाधिक काळ राहिलेली राजबंदिनी अशी आँग सान स्यू ची हीची रूढार्थाने ओळख आहे.

इंग्लंडमध्ये नोकरी व संसार करणारी एक ब्रह्मी स्त्री. आपल्या आजारी आईची सेवा करायला मायदेशी येते आणि अचानक एके दिवशी मायदेशाच्या राजकारणात उतरते. सरकार अमानुष हिंसाचार करत असताना सगळ्या देशाला अहिंसेच्या मार्गानं लढायला उद्युक्त करते... हुकूमशाहीविरुद्ध निर्भयपणे उभं राहण्याची शिक्षा म्हणून वर्षानुवर्षं स्थानबद्धता भोगते... पती, मुलं, संसार कायमचा सोडून द्यायला तयार होते. एक सामान्य गृहिणी ते जागतिक स्तरावरची नेती हा स्यू चीचा प्रवास फारच चित्तथरारक आहे. ८ मार्च या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने स्यू ची चे थोडक्यात चरित्र आणि त्यासाठी म्यानमारचा (ब्रह्मदेशाचा) इतिहासही जाणून घेऊयात...

४ जानेवारी १९४८... ब्रह्मदेशातील ब्रिटिश साम्राज्याचा अंत... ब्रह्मी स्वातंत्र्याची पहाट. सर्वत्र आनंदी आनंद... पंतप्रधान नू यांनी झेंडा फडकवला... सर्व उपस्थितांना त्या क्षणी आठवत होता तो आँग सान ! देशाच्या स्वातंत्र्यासाठी दोन युद्ध अंगावर झेलणारा स्वातंत्र्यसेनानी! पण इतिहासातील अनेक राष्ट्रपुरुषांच्या भाळी लिहिलेला शाप नियतीनं आँग सानच्या माथ्यावरही लिहिला होता. १९ जुलै १९४७ ला आँग सानची हत्या झाली होती. आँग सानच्या दुर्दैवी अंतानंतर त्याची दोन वर्षांची मुलगी स्यू ची आणि तिची दोन भावंडं यांचं संगोपन आँग सानची सुविद्य पत्नी खिन ची हिने अत्यंत काळजीपूर्वक केलं. स्यू चीला तिचे वडील आठवत नसले तरी त्यांच्या कर्तृत्वाविषयी आईकडून व इतरांकडून ऐकून तिच्या मनातील त्यांची प्रतिमा भव्यदिव्य होत गेली.

स्यू चीला रंगून, दिल्ली येथे उत्तम शाळेत शिक्षण मिळालं. तिथे ती पुस्तकांच्या विश्वात रमू लागली. महाविद्यालयात राज्यशास्त्राचा अभ्यास करताना तिने भारतीय स्वातंत्र्यलढ्यावरची पुस्तकं वाचली. पुढे निमित्ता-निमित्ताने जगभरची युद्धे व क्रांत्यांचा अभ्यास तिने केला; पण महात्मा गांधींची निर्भयता, सत्याग्रह आणि अहिंसा या तत्त्वांची बिजं तिच्या मनात नकळत कधी पेरली गेली हे तिलाही समजलं नाही.

ऑक्सफर्डला महाविद्यालयीन शिक्षण घेताना स्यू चीने आपल्या आचारविचारातील ब्रह्मीपण पूर्ण जपले होते. तिथेही ती पावलापर्यंत येणारी लुंगी, बंद गळ्याचा ब्लाऊज, केसात माळलेली फुलं अशा पेहरावात वावरायची. अतिशय समंजस, मृदू स्वभावाच्या स्यू चीने तिथे अनेक मित्र-मैत्रिणी जोडल्या. अभ्यासात-खेळात मागे असलेल्या मैत्रिणींना धीर देत त्यांचा आत्मविश्वास परत मिळवून द्यायला ती मदत करायची. समोरच्या माणसाची जातपात, धर्म, वंश न पाहता माणूस म्हणून त्या माणसाच्या व्यथेपर्यंत आपल्याला पोहोचता यायला हवं, या खिन चीच्या-तिच्या आईच्या संस्कारांचा स्यू चीला पुढे देशातील जनतेचं नेतृत्व करताना खूप उपयोग झाला.

महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळात तिने ठरवून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनण्याचा निश्चय केला. त्यानुसार पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यावर पुढील शिक्षणासाठी स्यू ची अमेरिकेत न्यूयॉर्कला गेली.

न्यूयॉर्कमध्ये सुरुवातीला स्यू चीने संयुक्त राष्ट्रसंघात सहायक सचिव म्हणून नोकरी मिळवली. १९७४ मध्ये स्यू ची आईला भेटायला रंगूनला आली तेव्हा सरकारी अधिकाऱ्यांनी तिची कसून उलटतपासणी घेतली.

सौंदर्याच्या काचेमधुनी जगाकडे पाहिले ।
संभ्रम, विभ्रम, भ्रमाचेही मग अभ्र दूर जाहले ।।

तिने कुठलीही सरकारविरोधी कारवाई करू नये, यासाठीची ती चौकशी होती. तेव्हा स्यू चीने स्पष्ट शब्दात उत्तर दिलं, 'मी परदेशात असेपर्यंत तरी कुठलीही सरकारविरोधी कारवाई करणार नाही.' हे उत्तर ऐकून अधिकाऱ्यांचं समाधान झालं, पण त्यावेळी खरं म्हणजे तिच्या तोंडून नियतीच बोलली होती. परदेशातून नव्हे, तर मायदेशात येऊनच ती सरकारविरोधी कृती करणार होती...

ऑक्सफर्डमध्ये तिची मायकेल ॲरिस या बुद्धिमान तरुणाशी मैत्री झाली, ती चक्क मायकेलच्या प्रेमात पडली होती. 'भविष्यात माझ्या मायदेशी, माझ्या बांधवांना गरज पडली आणि प्रसंगी तिथे जावं लागलं तर तू मला मदत करशील का?' या स्यू चीच्या प्रश्नावर मायकेलने तिला सर्वतोपरी सहकार्य देण्याचं वचन दिलं. (ते आजन्म पाळलंही) तेव्हा स्यू चीने आईचा विरोध पत्करून मायकेलशी विवाह करण्याचा निर्णय घेतला.

परदेशात राहून स्यू ची वडिलांच्या कार्याचा वारसा पुढे कशी काय नेऊ शकणार? समजा, तिनं तसं काही कार्य करायचा प्रयत्न केलाच तर ब्रह्मी सरकार व जनता त्या सगळ्याला कसा प्रतिसाद देणार, याची काळजी खिन चीला वाटत होती. परंतु स्यू ची आपल्या निर्णयावर ठाम राहिली. विवाहानंतर ती मायकेल समवेत भूतानला जाऊन काही काळ संसारात पूर्ण रमली. एकीकडे वाचन चालूच होतं. मनात आपल्या देशवासियांचे विचार होते. वडिलांचा वारसा आपण पुढे न्यायला हवा हा विचार तिला अस्वस्थ करत होता. पण म्हणजे नेमकं काय करायचं? कार्याची नेमकी दिशा मिळावी म्हणून ती चाचपडत होती. मायकेललाही तिची अस्वस्थता समजत होती. या अस्वस्थतेतून देशकार्याची नेमकी दिशा सुचत नाही तोपर्यंत तिने आपल्या वडिलांचं चरित्र लिहायचा निश्चय केला. त्यानिमित्ताने सुरू झाला ब्रह्मदेशाच्या इतिहासाचा, संस्कृतीचा, स्वातंत्र्य लढ्याचा अभ्यास! चरित्र लेखनाचा अंतिम टप्पा सुरू असताना तिच्या मनात १९४८ साली ब्रह्मदेशाला मिळालेल्या स्वातंत्र्यानंतरच्या राजकीय घडामोडींविषयी कुतूहल निर्माण झालं.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ब्रह्मदेशात अनेक राजकीय उलथापालथी झाल्या होत्या. देशात आंतरिक यादवी निर्माण झाल्यामुळे साम्यवाद्यांच्या कारवाया जोरात सुरू झाल्या. तत्कालिन पंतप्रधान नू यांच्याकडे नेतृत्वगुण पुरेसे नसल्याने सहकाऱ्यांत मतभेद निर्माण झाले. १९५८ मध्ये देशात पहिली लष्करी राजवट सुरू झाली. जनरल ने विनने देशाची सूत्रं हाती घेतल्यावर प्रभावी कारभाराचा आभास निर्माण केला. देशातील बंडखोरी, वांशिक गटांच्या करावाया, गुन्हेगारी यांना त्याने आळा घातला. १९६० मध्ये निवडणुकांत 'नू'ची युनियन पार्टी बहुमताने निवडून आली. पण पंतप्रधानपदाची सूत्रे हातात घेतल्यावर साम्यवादाचा प्रभाव रोखण्यासाठी त्याने बौद्ध धर्माला राष्ट्रीय धर्म म्हणून मान्यता दिली. या कृतीने पुन्हा वांशिक जनता बिथरली. हिंसक कारवाया, देशात पुन्हा एकदा अराजकसदृश परिस्थिती निर्माण झाली. २ मार्च १९६२ रोजी पहाटे जनरल ने विनने पुन्हा लष्कराचा उठाव घडवला. व नभोवाणीवर घोषणा करून सांगितलं : ''देशात परत सगळीकडे अराजक माजलंय. बिघडलेली स्थिती सुधारण्यासाठी लष्कराने देशाची सूत्रे हाती घेतली आहेत.'' ने विनच्या घोषणेने सामान्य जनतेला धक्का बसला. त्याच दिवशी संसद बरखास्त करून त्याने घटनाही रद्द केली. व 'देशात माझा शब्द हा अंतिम शब्द असेल' ही घोषणा केली. सर्वत्र लष्कराचा कारभार सुरू झाला.

देशात काय चाललंय हे बाहेरच्या जगाला कळू नये म्हणून जनरल ने विनने सर्व परदेशी पत्रकारांना देशाबाहेर हाकलले. खाजगी वृत्तपत्रे बंद केली. प्रकाशनांवर सरकारी नियंत्रण लादलं. सर्व अर्थव्यवहारांचे राष्ट्रीयीकरण केलं. ने विनचा मनमानी कारभार सुरू झाला. तोपर्यंत १९८८ साल उजाडलं होतं. नेमक्या याच काळात खिन चीला हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने स्यू ची मायदेशी आली. रुग्णालयात आईची शुश्रुषा करताना तिला देशस्थितीचं भान आलं. रुग्णालयात शेकडो जखमी तरुण मुलं दिसत होती. त्यांना भेटायला त्यांचे मित्र-मैत्रिणी येत होते. सर्वत्र एकाच दहशतीचं अस्वस्थ वातावरण होतं. आँग सानची पत्नी व मुलगी रुग्णालयात असल्याचे कळल्यावर या मुलांना त्यांना भेटायची तीव्र इच्छा निर्माण झाली. स्यू चीला भेटून मुलांनी देशात घडणाऱ्या ने विनच्या अत्याचारांची माहिती तिला दिली. स्यू चीचे

। जरुर शोधा- http://www.exploratorium.edu (ओरिगामी, भाषा, खगोल-जीवशास्त्र यांना वाहिलेले इ मासिक)।

प्रायोजक – श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे

वडील आँग सांग या मुलांचं दैवत होतं. खिन चीला भेटायला येणारे, ने विनने काढून टाकलेले लष्करातले वरिष्ठ अधिकारीही स्यू चीला भेटू लागले. ने विनची दडपशाही, क्रौर्य, अत्याचारी राजवट याच्या दुर्दैवी कहाण्या ऐकून स्यू ची सुन्न झाली. आता तिला या लढ्यात आपण उतरलंच पाहिजे, हे प्रकर्षानं जाणवलं.

सीमेवरची वांशिक जनता केंद्र सरकारबरोबरच्या लढ्यासाठी अफूच्या व्यापारातून आधुनिक शस्त्रास्त्रं मिळवत होती. ब्रह्मदेशाचे लष्कर, पोलीस प्रशासन भ्रष्टाचाराने बरबटलेलं होतं. सामान्य जनता, बेरोजगारी उपासमारी, दारिद्र्याने वेढलेली होती; तर लष्करी अधिकारी धनसंपत्ती जमवत होते. तशात १९७५ मध्ये भूकंपाचा जबरदस्त तडाखा ब्रह्मदेशाच्या मध्य प्रांताला बसला. कुणीतरी आपल्याविरुद्ध उठाव करेल या भयगंडाने ने विन जनतेवर अनन्वित अत्याचार करत होता. आपल्या ध्येय धोरणांना विरोध करणाऱ्यांना देशद्रोही ठरवून तो सरळ तुरुंगात डांबत होता. देशातल्या जनतेने आपल्या विरुद्ध उठाव करू नये म्हणून लोकांना एकत्र येण्यासही बंदी होती. सारी जनता भयाने कोंदटलेल्या वातावरणात घुसमटत होती. १९८० च्या दशकात अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमती आकाशाला भिडल्या. जीवघेण्या महागाईने जनतेच्या मनात चीड निर्माण झाली. पण सरकारविरुद्ध ब्र काढण्याची कुणाची हिंमत नव्हती.

बदलत्या काळाबरोबर ब्रह्मदेशातील तरुण पिढीला सत्ताधाऱ्यांची मनमानी मंजूर नव्हती. कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय जनरल ने विनने देशातील चलन रद्द केलं. हे निमित्त या असंतोषाला वाचा फोडायला कारणीभूत झालं. १९८७ च्या सप्टेंबर महिन्यात कॉलेजमध्ये फी भरायला गेल्यावर आपल्याजवळच्या नोटा रद्द झाल्याचं कळलं तेव्हा युवकांना धक्का बसला. फीसाठी जवळचे पैसे चालत नाहीत- फी नाही, तर कॉलेज नाही- परीक्षा नाही, या विचाराने विद्यार्थी संतापाने पेटून उठले. रस्त्यावर उतरून तोडफोड, जाळपोळ करू लागले. आणि यापुढे ने विनचा अत्याचार जनता सहन करणार नाही, अशी स्थिती निर्माण झाली. पुढे एकामागून एक अशा घटना घडल्या की रंगून विद्यापीठातले विद्यार्थी रस्त्यावर उतरले. हिंसाचार उसळला. त्यांचा विरोध दडपण्यासाठी सैनिकांनी गोळीबार केला. आता लोकांची सहनशक्ती संपली.

विद्यार्थी, सामान्य जनतेसमवेतच लष्करातील काहीजणही या आंदोलनात सामील झाले तर, परिस्थिती हाताबाहेर जाईल या भीतीने जनरल ने विनने राजीनामा देऊन १९८८ मध्ये निवडणुका जाहीर केल्या.

त्यानंतर जनरल ने विनने सत्ता हाती घेऊन निवडणुकांचा डाव उधळून लावला. विद्यार्थी, बौद्ध-भिक्षू यांनी एकत्र येऊन देशव्यापी संप घडवून आणला. २६ वर्षांनंतर वंश, धर्म, जात, पंथ विसरून देशातील जनता एकत्र आली. हे आंदोलन क्रूरपणे मोडून काढण्यात आलं. हजारो माणसं मारली गेली, जखमी झाली, पकडली गेली. आता स्यू चीला बघ्यांची भूमिका घेणं शक्य नव्हतं. ती जाहीरपणे या संग्रामात उतरली. 'काही करून हिंसाचार थांबायला हवा, लोकांनी शांततेने आंदोलन करावं, सरकारने सर्व आंदोलकांना सोडून द्यावं' अशी मागणी करणारे जाहीर पत्रक स्यू चीने काढले. या पत्रकाने स्यू ची एकदम प्रसिद्धीच्या झोतात आली. आंदोलकांचे मनोधैर्य उंचावले. बीबीसीवरून ब्रह्मदेशातील भयानक नरसंहाराची वार्ता जगभर पोहोचली.

सरकारी कर्मचारी, वकील, विद्यार्थी, जनसामान्य सर्वजण आंदोलनात उतरले. त्यावेळचे राष्ट्राध्यक्ष डॉ. माऊंगला देशात लावलेला लष्करी कायदा उठवणं भाग पडलं. वृत्तपत्रांतून अभिव्यक्तीस्वातंत्र्याच्या मागणीसाठी लेख येऊ लागले. हुकूमशाहीचा उघड निषेध होऊ लागला. या आंदोलनाचं नेतृत्व करायचं तर स्यू चीला घरसंसार किंवा देशसेवा एकाची निवड करावी लागणार होती. मुलांना मायकेलवर सोपवून स्यू ची सर्वार्थाने लढ्यात उतरली. मायकेलनेही तिला पूर्ण सहकार्य दिलं. देशात लोकशाही येणार; पण त्यासाठी होणारा हिंसाचार थांबवायला काय करावं याचा विचार ती करू लागली.

आपल्या समर्थकांना एकत्र करून तिने अहिंसेचा मार्ग लोकांना पटवण्यासाठी जाहीर सभांचा धडाका लावला. त्या सभा अयशस्वी कशा होतील यावर सरकारने लक्ष केंद्रित केले. तिच्याविरुद्ध वैयक्तिक चिखलफेक करणारा

लिहिता-लिहिता, तलवारीची धार लेखणी ल्याली।
वाचुन-वाचुन ज्ञानज्योतही उजळत-उजळत गेली ।।

प्रकार केला; पण अतिशय निर्भयपणे स्यू ची लोकांशी संवाद साधत राहिली. 'आपल्या संघटनेला शिस्तीची जोड द्या. प्रत्येकाचे विचारस्वातंत्र्य जपा. दडपशाही सहनही करू नका वा स्वत:ही करू नका', असे विचार ती मांडू लागली. देशभरातल्या तमाम ब्रह्मी जनतेने तिचं नेतृत्व निर्विवादपणे स्वीकारलं आणि आंदोलनाला एक वेगळीच दिशा मिळू लागली. सरकारने पुन्हा निवडणुकांची घोषणा केली पण नावालाच.

पुन्हा एकदा लष्कराने सत्ता हाती घेतली. पुन्हा हुकूमशाही, अत्याचार! पुन्हा हिंसाचार! स्यू ची कमालीची अस्वस्थ झाली. चिरस्थायी शांततेसाठी अहिंसेचा मार्ग लोकांना कसा पटवून द्यायचा? लष्कराने स्थापन केलेल्या 'स्लॉर्क' या मंडळाकडे सर्व अधिकार होते.

विद्यार्थी, पत्रकार, लेखक, प्राध्यापक, डॉक्टर्स, वकील, कलावंत जे जे म्हणून आंदोलनात सहभागी होते त्यांना अटकेत टाकण्यात आलं. अनन्वित अत्याचार, देहदण्ड! सत्ताबदलाचा कोणताही प्रयत्न इथून पुढे सरकार अधिक क्रौर्याने मोडीत काढील, हे ध्यानात आल्यावर स्यू चीने संयुक्त राष्ट्रसंघाकडून दबाव आणण्याचा प्रयत्न केला. रंगूनमधील सर्व राजदूतांना भेटून ब्रह्मदेशातील अत्याचारांबद्दल संयुक्त राष्टसंघाच्या आमसभेत मुद्दा यावा अशी विनंती तिने केली. जगभर पत्रे, निवेदन, पाठवून ती लष्कराच्या अत्याचाराला वाचा फोडत होती. त्याचा परिणाम म्हणून जगातल्या सर्व वित्तीय संस्थांनी ब्रह्मदेशाची आर्थिक नाकेबंदी सुरू केली. त्यामुळे सरकारची प्रचंड कोंडी झाली. चीन, बांगलादेश, सिंगापूर, भारत यांनी मात्र ब्रह्मदेशाशी व्यापारी संबंध जोडले.

जागातिकीकरण, उदारीकरण यांचा आव आणून स्लॉर्कने देशात लोक सुखी आहेत असं चित्र पर्यटकांसमोर उभं करायचा यत्न केला. ब्रह्मी जनतेला कुठल्याही परदेशी माणसाशी बोलायची बंदी होती. मात्र जगातील विविध भागातून येणाऱ्या आर्थिक दडपणामुळे नमतं घेत १९९० मध्ये स्लॉर्कने निवडणुका जाहीर केल्या. त्यावेळी 'नॅशनल डेमॉक्रॅटिक लीग' या पक्षाची स्थापना करून स्यू ची आपल्या सहकाऱ्यांसमवेत निवडणुकीत उतरली. झंझावाती प्रचारदौरे सुरू झाले. मात्र तिच्या सभा होऊ न देण्याचा विडाच सरकारने उचलला. गावातील लोकांनी तिला भेटू नये म्हणून घराबाहेर पडल्यास गोळी घालण्याची भीती दाखवण्यात आली. तिला सभास्थानाकडे जाताना अडवले गेले. तेव्हाही तिची निर्भयवृत्ती दिसून आली. 'प्राण गेला तरी बेहत्तर, माझ्यामागे तुम्ही लढा चालवा, माझ्या मृत्यूचा फायदाही लढ्यासाठी करा, लढा अर्धवट सोडू नका' असा संदेश तिने आपल्या कार्यकर्त्यांना दिला. राष्ट्रीय एकात्मतेचा आग्रह धरून ती गावोगाव फिरत राहिली. आता त्यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांची धरपकड सुरू झाली. पण स्यू चीला मात्र २० जुलै १९८९ रोजी घरातच स्थानबद्ध करण्यात आले. कार्यकर्त्यांशी, जगाशी असलेला तिचा संबंध तोडण्यात आला. 'आपल्यालाही आरोप ठेवून अटक करण्यात यावी', असा आग्रह स्यू चीने धरला. पण जनमानसात क्षोभ उसळेल म्हणून तो अमान्य करण्यात आला. स्यू चीने देश सोडून मायकेलसमवेत निघून जावे, यासाठी प्रयत्न सुरू झाले. तिला मुलांपासून तोडण्यात आले. तिच्या कार्यकर्त्यांवर अमानुष अत्याचार करण्यात आले. पण स्यू ची कोलमडून पडली नाही.

एकान्तवासात आपलं मन ती निर्धाराने सकारात्मक ठेवू लागली. १९८९ मध्ये देशाचे नाव बदलून 'म्यानमार' ठेवण्यात आले; पण जनतेला मात्र आपली 'बर्मा' ही ओळखच हवी होती. त्यासाठी जनता निदर्शनं करत होती. १९९० मध्ये झालेल्या निवडणुकीत स्यू चीच्या एनएलडी पक्षाला प्रचंड बहुमत मिळालं. पण स्लॉर्कने या निवडणुका सत्ताबदलासाठी नसून देशाची घटना लिहिण्यासाठी, लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी असावेत म्हणून होत्या, अशी भूमिका घेतली.

निवडणुकीत मिळालेला जनादेश धुडकावून लावणाऱ्या ब्रह्मी सरकारची मग्रुरी बघून जगही दिङ्मूढ झालं. स्यू ची व तिचे सहकारी या सर्वांचे कष्ट वाया गेले होते. पण स्यू चीचा आपल्या देशातल्या जनतेला लोकशाही, मानवी हक्क, आत्मसन्मानाचं जिणं मिळवून देण्याचा लढा इतका प्रभावी ठरला की १९९१ या वर्षासाठीचा शांतताविषयक 'नोबेल पुरस्कार' तिला जाहीर करण्यात आला. हा जागतिक कीर्तीचा सन्मान मिळाला तेव्हाही स्यू ची मात्र आपल्या देशात स्थानबद्धतेत होती. स्यू चीने पुरस्काराची सर्व रक्कम

अभिनंदन... ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर - 'पु. ल. सन्मान', 'जीवनसाधना गौरव पुरस्कार' ।
प्रायोजक – श्री. गौरव सहस्रबुद्धे, डोंबिवली

देशासाठी देण्याचे जाहीर केले.

राजकीय कैदेत असताना नोबेल पुरस्कार मिळालेली आँग सान स्यू ची ही जगातील पहिली स्त्री होती. स्यू ची च्या स्थानबद्धतेला साडेसहा वर्षं पूर्ण झाल्यावर देशाची अवस्था सावरण्याच्या प्रयत्नांसाठी तिची सुटका करण्यात आली. मात्र तिने सरकारशी हातमिळवणी करणे स्पष्टपणे नाकारले. देशातील अराजक, अत्याचार, आर्थिक दुरवस्था, विस्कळित जनजीवन सर्व तसेच चालू होते. स्यूची स्थानबद्धतेतून बाहेर आल्यावर पुन्हा जनता तिच्याभोवती जमा होऊ लागली. पुन्हा स्यू चीवर बंधनं घातली जाऊ लागली.

१९९८ मध्ये एनएलडीच्या अधिवेशनात सरकारवर घटना प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी दबाव आणण्यात आला. स्यू चीने नेतृत्व स्वीकारल्यापासून ती अहिंसेच्या मार्गाने लढू पाहात होती. तरीही लढ्यात कार्यकर्त्यांच्या प्राणांच्या आहुती पडतच होत्या. स्यू ची एकीकडे तिच्या पक्षाला नेस्तनाबूत करू पाहणाऱ्या सरकारबरोबर लढत होती; तर दुसऱ्या बाजूला अत्याचारात पोळलेल्या तिच्या कार्यकर्त्यांच्या घरी स्वत: जाऊन घरच्यांना धीर देत होती. त्यांचे मनोबल वाढवत होती. पण सरकार तिला रंगूनबाहेर पडू देत नव्हतं. ती निर्धाराने रंगूनबाहेर जनतेला, कार्यकर्त्यांना भेटायला निघाली; तेव्हा त्यांच्या गाड्या अडवण्यात आल्या. स्यू ची माघार घेईना. शेवटी तिला जबरदस्तीने रुग्णालयात हलवण्यात आले. प्रकृती पूर्ववत झाल्यावर स्यू ची पुन्हा रंगूनबाहेर निघाली. तिला अडवून पुन्हा स्थानबद्ध करण्यात आलं. तिच्या या स्थानबद्धतेचे पडसाद पुन्हा जगभर उमटले. लष्कराच्या शस्त्रांपुढे एक नि:शस्त्र बाई अहिंसेच्या मार्गाने सातत्याने लढा देत राहिली, देशावरच नव्हे तर अख्ख्या जगावर तिच्या नावाची मोहिनी पसरली होती. शेवटी पुन्हा तिची सुटका करणं सरकारला भाग पडलं. स्यू ची देशभर सभा घेत फिरू लागली. तिच्या समवेत कार्यकर्त्यांच्या गाड्यांचा ताफा असायचा. या भटकंतीत तिच्यावर जीवघेणा हल्ला करण्याचाही प्रयत्न झाला. पुन्हा तिला पकडून तुरुंगात टाकण्यात आलं.

२००७ साली चरितार्थापुरताही पैसा लोकांच्या हाती पडत नव्हता. जीवनावश्यक वस्तूंचे भाव गगनाला भिडले होते. जनतेच्या असंतोषाचा कडेलोट झाला. पुन्हा आंदोलन! पुन्हा दडपशाही!

२००६ मध्ये 'नर्गिस' या महाभयंकर वादळाचा तडाखात ब्रह्मदेशला बसला. २०१० साली पुन्हा निवडणुकांची वेळ आली, तेव्हा स्यू चीला पुन्हा स्थानबद्ध करण्यात आलं. निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या कायद्यांनुसार स्यू ची व तिचे तुरुंगातील कार्यकर्ते, बौद्ध भिक्षू, सरकारी कर्मचारी यांना निवडणुकीत सहभागी होता येणार नव्हतं. सत्ता परत अधिकृतरित्या लष्कराच्या हातात राहावी अशी योजना करण्यात आली होती. जनतेने मोठ्या प्रमाणावर निवडणुकीवर बहिष्कार टाकला. निवडणुका संपल्यानंतर स्यू चीची १३ नोव्हेंबर २०१० रोजी बिनशर्त सुटका करण्यात आली.

ब्रह्मदेशातल्या हवेत चैतन्य सळसळू लागलं. हजारो लोकांकडून तिला मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून सरकार नमलं. तिच्या सुटकेची अधिकृत घोषणा राष्ट्रीय दूरदर्शनवरून करण्यात आली. लोक भान विसरून स्यू चीचा जयजयकार करत होते.

स्यू चीच्या सुटकेने ब्रह्मदेशाच्या परिवर्तनाला सुरुवात होतेय. ब्रह्मी जनता, लष्कर व तेथील वांशिक गट यांच्यात फक्त आँग सान स्यू चीच समेट घडवून आणू शकते हे मनातून सर्वांना पटलंय. सरकारचं तिच्या हालचालींवर सतत लक्ष आहे. त्यामुळे तिचे स्वातंत्र्य किती काळ अबाधित राहील याविषयी साशंकताच आहे. पण ब्रह्मदेशातील तरुण पिढी स्यू चीकडे आशेने पाहातेय. ब्रह्मदेशाचे प्रश्न आजही तितकेच गंभीर आहेत. पण नव्या पिढीला बरोबर घेऊन ऑग सान स्यू चीनं या लढ्याच्या उत्तरार्धाला सुरुवात केलीय!

– शैलजा देशमुख

सी-२, पाटे संस्कृती, सहकारनगर नं. १, पुणे 411009

स्यू चीचे समग्र चरित्र व म्यानमारचा इतिहास जाणून घेण्यासाठी अवश्य वाचा : **राजबंदिनी** - प्रभा नवांगुळ (राजहंस प्रकाशन, किं. रु. २५०, पृष्ठ संख्या २८८)

डाव्या-उजव्या हातांमध्ये कुणी न डावा, उजवा ।
दोघांकडून मजेत अपुली करून घ्यावी सेवा।।

चित्रगोष्टी ४

चित्रा वैद्य

स्थिरचित्र - १

स्मरणचित्र म्हणजे एखाद्या प्रसंगाचे स्मरण करून काढलेले चित्र. त्यासंबंधात माहिती आपण मागच्या (सौर माघ) अंकातून पाहिली. यावेळी आपण 'स्थिरचित्र' या चित्रप्रकाराबद्दल जाणून घेऊया. स्थिरचित्र काढण्याचा तसा आपला सराव नसतो. पण 'चित्रकला' येण्यासाठी स्थिरचित्र काढण्याचा उपयोग होतो. स्थिरचित्र म्हणजे समोर दिसणाऱ्या स्थिर वस्तूंचे चित्रण करणे. यावरून तर स्थिरचित्र एकदम सोपं सहज वाटतं, हो ना? पण वाटतं तेवढं हे चित्रण करणं सोपं नाही. समोरच्या वस्तूंचा एकमेकांशी संबंध, त्यांची त्रिमितिय रचना, प्रकाश योजना अशा सर्व गोष्टींचा विचार करणं त्यासाठी आवश्यक ठरतं. या लेखात आपण स्थिरचित्रांबद्दलचा इतिहास, त्याचे प्रकार याबद्दल जाणून घेणार आहोत.

स्थिरचित्र या चित्र प्रकाराची सुरुवात प्राचीन ग्रीक-रोमन काळी झाली. त्यावेळी धार्मिक कारणांसाठी चित्रे काढली जात. प्राचीन इजिप्शियन काळात राजे-महाराजांच्या पिरॅमिडमधील थडग्यांमध्ये स्थिरचित्राच्या स्वरूपात खाद्यपदार्थांचे व जीवनावश्यक वस्तूंचे चित्रण केले जाई. प्राचीन ग्रीक काळात मोठमोठ्या फुलदाण्यांवर रोज वापरातील वस्तूंची चित्रे काढली जात. रोमनकाळातील भित्तीचित्रांमध्येही स्थिरचित्रे आढळली आहेत. एकोणिसाव्या शतकातील चित्रकारांचा स्थिरचित्र काढताना अधिक तपशील न दाखवता जाड मोठे ब्रशचे फटकारे व रंगसंगतीवर जास्त भर दिसतो. चित्रकार माने, मोने, सेझाँ, व्हॅन गॉग यांची चित्रे याचे उदाहरण आहे. व्हॅन गॉगचे प्रसिद्ध चित्र 'सनफ्लॉवर्स' याच पद्धतीने केले आहे. विसाव्या शतकातील क्युबिस्ट चित्रकार पिकासो, ब्राक यांनी वस्तूचे भाग पाडून त्याचे वेगवेगळ्या कोनातून विश्लेषण करून अमूर्त शैलीत परत एकत्रीकरण केलेले दिसते. यावरून तुमच्या लक्षात येईल की काळाप्रमाणे चित्रकारांनी आपली स्वतंत्र अशी शैली विकसित करून स्थिरचित्रे रंगवली आहेत.

आपण स्थिरचित्राचा कसा अभ्यास करावा? तुमच्या शालेय अभ्यासात तुम्ही प्रथमच स्थिरचित्र हा विषय हाताळणार आहात. त्याची सुरुवात प्रथम अर्थातच निरीक्षणाने करावी. समोर दिसणाऱ्या वस्तू, त्यांचे मुलभूत आकार, रंग, छायाप्रकाश, पोत याचा विचार करायची मनाला सवय लावावी.

स्थिरचित्र काढण्यासाठी वस्तू कुठल्या असाव्यात याला काहीही बंधन नाही. अगदी स्वयंपाकघरातील भांडी, कपबशा, किटली, चमचे, अभ्यासाच्या टेबलावरील पुस्तके, कंपासपेटी, चित्र काढतानाचे सामान - पॅलेट, रंग, ब्रश, इ. कोपऱ्यात ठवलेले चपला, बूट, खुंटीवर टांगलेले कपडे, दुकानातील फळीवर ठेवलेल्या वस्तू, बाजारातील भाज्या-फळे, बर्फाच्या गोळेवाल्याकडील रंगीत सरबताच्या बाटल्या अशा अनेक वस्तूंचे निरीक्षण करत राहावे. त्यांचे शीघ्रचित्र (पटकन मूलभूत आकार

स्थिरचित्र- इजिप्शियन चित्रशैली



चित्रकार व्हॅन गॉग व पिकासो यांची स्थिरचित्रे

। दिनविशेष... १५ मार्च - आंतरराष्ट्रीय ग्राहक दिन।

प्रायोजक – श्री. श्रीकांत कुलकर्णी, ठाणे

चित्रकार चित्रा वैद्य

काढून चित्र काढणे) काढायची सवय लावावी. प्रथम एक-एक वस्तू समोर ठेवून त्याचे पद्धतशीर चित्रण करावे. नंतर हळूहळू २-४ वस्तू एकत्र मांडून त्याचा सराव करावा. वस्तूंचे एकमेकांशी नाते, ठरावीक दिशेने पडलेला प्रकाश, छाया, परावर्तित प्रकाश, धातूच्या वस्तूंवर पडलेले इतर वस्तूंचे प्रतिबिंब या सर्वांचे कलात्मक चित्रण करायचा प्रयत्न करावा.

असेच एकदा फळबाजारात फिरताना ताजी, रंगीबेरंगी फळं पाहून माझं मन प्रफुल्लित झालं. हिरव्या, लाल रंगाच्या आणि विविध आकाराच्या भाज्या, फळे-केळी, पपई, द्राक्षे, संत्री, मोसंबी, अननस, स्ट्रॉबेरी...अहाहा! नेहमीप्रमाणे भरपूर फळे घ्यायचा मोह आवरला नाही. चित्र काढायचे मनात आले आणि फळांबरोबर टोपलीसुद्धा घेऊन आले. टोपली, फळं, पांढरं कापड याबरोबरच घरातला पंचधातूचा छोटा घोडा त्यात ठेवल्यावर मांडणी एकदम परिपूर्ण वाटायला लागली. जलरंगात हे चित्र काढताना प्रत्येक वस्तूचा रंग, त्यावरील छायाप्रकाश व त्याचे वेगवेगळे पोत दाखवताना खूप मजा आली. (मुखपृष्ठाच्या आतील पानावर तुम्ही हे चित्र पाहिले असेलच.)

कधी कधी अचानक आपल्याला समोर दिसणाऱ्या वस्तूमध्ये स्थिरचित्र सापडू शकते. तशी नजर आपल्याला विकसित करावी लागते. माझ्या वरील चित्रात दाखवलेला घराचा एक कोपरा याचे उदाहरण म्हणावे लागेल. यातील पांढरी-गुलाबी फुले आणि बांबूची नाजूक पाने, पॉटचे काचेच्या टीपॉयमध्ये पडलेले प्रतिबिंब आणि खिडकीच्या काचेतून बाहेर दिसणारे निसर्गाचे अस्पष्ट रंग याने एक वेगळीच वातावरणनिर्मिती झाली आहे.

तुम्ही जेव्हा भरपूर सराव कराल आणि चित्रे काढायला लागाल तेव्हा यातला खरा आनंद तुम्हीसुद्धा अनुभवू शकाल. निरीक्षणावर भर द्या, शीघ्रचित्रे काढायचा सराव करा. पुढील भागात आपण पायरी-पायरीने स्थिरचित्र कसे काढावे याचा अभ्यास करू.

♣ ♣

– **चित्रा वैद्य**
ए-३/श्रीकुंज सोसायटी, हनुमान मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई -57
info@artist-chitra.com

अवश्य भेट द्या : 'कॉल ऑफ द हिल्स्' हे चित्रा वैद्य यांचे चित्र प्रदर्शन
(जहांगिर आर्ट गॅलरी, मुंबई. १३ ते १९ मार्च २०१२, ११ ते ७ या वेळात.)

एक रोप लावू या रोज, फुलतिल शेते-बागा ।
एक स्मित उमलवुया रोज, हसवू साऱ्या जगा ।।

रंग रंगात तरंग

थोडी पानगळ..., थोडी-
नवी नवेली पालवी
देई शिशिरा निरोप
नवा बहर लाघवी।।१ ।।

त्याच्या हाळीमुळे होई
सारे आसमंत जागे
निळ्या-जांभळ्या आभाळी
शुभ्र प्रकाशाचे धागे।।२ ।।

तिळगुळ स्नेहमयी
गोड संक्रमण होई
उत्तरायणासोबती
रथ सप्तमीचा येई।।३ ।।

हळदुल्या तेजामुळे
ताजी ताजी झाडे पाने
रंग हिरवा-पोपटी
गाई वसंताचे गाणे।।४ ।।

हुताशनी पुनवेच्या
होळीमधली राख ही
वारा उधळत नेई
दिशा कोंदाटून दाही।।५ ।।

थंडी पळे दूर दूर
जाई दूर दूरदेशी
झळाळत्या उन्हालाही
येई भोवळ छानशी।।६।।

रंगपंचमीचा दिन
येई नटून सजून
'मित्र' पहाटे उगवे
रंग भगवा शिंपून।।७।।

। अभिनंदन... ज्येष्ठ कवी ग्रेस - 'साहित्य अकादमी पुरस्कार' ('वाऱ्याने हलते रान' ललित संग्रहाला)।
प्रायोजक - श्री. अजित परांजपे, पुणे

केशरिया पळसाचा
हळदीचा नि मेंदीचा
रंग पानांचा-फुलांचा
लालेलाल आळत्याचा।।८।।

मित्र-मैत्रिणीचा दंगा
रंग रंगांमध्ये सारे
वेडी खोडी, कुरघोडी
राग लटके, हासरे...!।।९।।

ओळखीचा अनोळखी
कोण कुठला कळेना
हासू ओठांत, पोटात
कश्शा कश्शात मावेना।।१०।।

रंग रंगात तरंग
सारे सारे मिसळले
छटा वेगळ्याच झाल्या
काही बाही हरवले...!।।११।।

उन्हापाण्यात खेळून
दुपारही सांजावली
वारा शहारा-भरारा
भुई रोमांचित ओली।।१२।।

ज्याचे रंगीत जीवन
आणि रंगीत संयम
अशा खुळ्यांचा हा खेळ
वेडे-खुळेच नियम !।।१३।।

बाल-तरुण-वयस्क
होऊनिया ‘अविचारी’
पाश झुगारून चाखी
बंध-मुक्तीची खुमारी।।१४।।

जगताना... धावताना...
थोडा विरंगुळा हवा
थोडे थबकावे... आणि...
वेग पकडावा नवा!।।१५।।

रंग व्हावे अंग अंग
श्वासाश्वासांत तरंग
होई जगण्यात दंग
त्याला भेटेल श्रीरंग!।।१६।।

– आश्लेषा महाजन
२३०, चित्ररेखा,
सहकारनगर – १,
पुणे 411009

मन दयेचा सागर, त्याने भरावी घागर ।
आणि करावी मोकळी, जगी तहानलेले फार ।।

भारताचा पहिला अंतराळवीर राकेश शर्मा

डॉ. निवास पाटील

राकेश शर्मा - भारताचे पहिले अंतराळवीर. नाशिकच्या 'गोदागौरव पुरस्कार प्रदान कार्यक्रमा'च्या निमित्ताने डॉ. निवास पाटील आणि राकेश शर्मा यांचा प्रत्यक्ष परिचय झाला. त्यावेळी जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. 'सारे जहाँ से अच्छा' हे शर्मांनी अंतराळातून भारतासबंधी काढलेले उच्चार आजही लाखमोलाचे वाटतात. या लेखातून या अंतराळ मोहिमेबद्दल वाचताना त्यावेळची तंत्रज्ञाची परिस्थिती लक्षात येते. आणि आज तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मारलेल्या गरुड भरारीमुळेही छाती अभिमानाने फुलून येते.

४ ऑक्टोबर १९५७ ला रशियाने स्पुटनिक अंतराळात सोडून अवकाश युगाला सुरुवात केली. त्याच देशाचा युरी गागारीन १२ एप्रिल १९६१ रोजी अवकाशात जाणारा पहिला अंतराळवीर ठरला. तर त्याच देशाची तेरेश्कोवा १६ जून १९६३ ला अंतराळात जाणारी पहिली महिला अंतराळवीर ठरली. रशियाच्या या अंतराळातील यशामुळे प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर असणारी अमेरिका अस्वस्थ झाली. या अस्वस्थतेतूनच योग्य त्या सुधारणा घडवून आणून अमेरिकेचा नील आर्मस्ट्राँग हा चंद्रावर पाऊल ठेवणारा पहिला अंतराळवीर ठरला. ''मानवाचे हे छोटेसे पाऊल असले तरी सर्व मानवजातीसाठी ती उत्तुंग झेप आहे,'' हे त्याने चंद्रावरून काढलेले उद्‍गार सर्वश्रुत आहेत. ३ एप्रिल १९८४ ला राकेश शर्मा अंतराळात गेले आणि ते भारताचे पहिले अंतराळवीर ठरले. अंतराळात असताना तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींनी त्यांना विचारले,

''तेथून भारत कसा दिसतो?'' यावर राकेश शर्मा उत्तरले,

''सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ताँ हमारा.''

१९६१ मध्ये पहिले अंतराळवीर असलेले युरी गागारीन भारतात आले होते. त्यावेळी ते म्हणाले,

''एक दिवस असा उजाडेल की, त्या दिवशी रशिया व भारतातील अंतराळवीर संयुक्तपणे अवकाशातील अज्ञाताचा वेध घेतील.''

त्यांचे हे भाकीत बरोबर २३ वर्षांनी म्हणजे १९८४ मध्ये खरे ठरले. तो दिवस होता ३ एप्रिल १९८४ चा. आदल्याच दिवशी म्हणजे २ एप्रिलला राकेश शर्मांची अंतराळवीर म्हणून अंतिम निवड झाली होती. या मोहिमेवर निघण्यापूर्वी मास्कोजवळील 'स्टार सिटी'तील गागारीन अभ्यासिकेत तीन अंतराळीवर गेले आणि तेथील डायरीत सह्या केल्या. समानव यान अंतराळात पाठविण्यापूर्वीचा तो एक विधी होता. मास्कोपासून दोन हजार किलोमीटर दूर असलेल्या बैकनूर (सोव्हिएत कझाकिस्तान) अंतराळस्थानकात चौदा मजली उंच रॉकेटवर बसविलेल्या 'सोयुझ टी-११' या यानात राकेश शर्मा, त्यांचे रशियन सहकारी युरी मालाशेव व गेनाडी स्ट्रेकालोव्ह पांढऱ्या शुभ्र अवकाश पोषाखात बसले होते. त्यांच्या अवकाश पोषाखावर सात उमद्या घोड्यांच्या रथावर आरूढ झालेले सूर्यनारायण आकाश प्रवासाला चालले आहेत, असे दाखविले होते.

। अभिनंदन... राष्ट्रीय पर्यावरण योद्धा - श्री. यशवंत मानखेडकर (८४ हजार रोपांच्या लागवडीसाठी)।

प्रायोजक – श्री. विद्याधर सहस्रबुद्धे, डोंबिवली

उलटी गणती सुरू झाली. भारतीय वेळेप्रमाणे संध्याकाळी सहा वाजून अडतीस मिनिटांनी अंतराळस्थानकातील संगणकाने एक छोटासा इलेक्ट्रिकल सिग्नल पाठविला. रॉकेटच्या इंधनाला बत्ती मिळाली. रॉकेटच्या खालच्या भागातून तीव्र स्वरूपाच्या ज्वाला बाहेर पडू लागल्या. सुमारे २० लाख अश्वशक्तीचा जोर यानाला मिळाला आणि ते यान एखादया भल्या मोठ्या भाल्याप्रमाणे निळ्या आकाशाच्या पोकळीत घुसले. संपूर्ण भारत देशात आनंदाची लाट पसरली. राकेश शर्मांचा भारतीयांना अभिमान वाटला. ते भारताचे पहिले अंतराळवीर ठरले.

इकडे मास्कोजवळील स्टार सिटीतील भव्य इमारतीच्या चौदाव्या मजल्यावरील फ्लॅटमध्ये शर्मांची पत्नी मधू आणि नऊ वर्षांचा मुलगा कपिल रंगीत दूरदर्शनवर काहीशा अस्वस्थतेत यानाच्या उड्डाणाची स्पष्ट अशी दृश्ये पाहत होते. त्याचवेळी भारतात हैद्राबाद शहरातील एका घरात शर्मांच्या मातोश्री तृप्ता आणि वडील देवेंद्रनाथ सतरंजीवर बसून खरखरणाऱ्या दूरदर्शनच्या पडद्यावर आपल्या मुलाचे कर्तृत्व डोळे भरून पाहात होते.

उड्डाणानंतर बरोबर नऊ मिनिटांनी यान पृथ्वीपासून २०० किलोमीटर उंच गेले. तेथून ते पुन्हा अवकाशात उडविले. त्यावेळी अंतराळवीरांना त्यांच्या छातीवर असलेला अदृश्य दाब नाहीसा झाल्याचे जाणवले. पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या शृंखलेतून अंतराळवीर मुक्त झाले होते. गुरुत्वाकर्षणविरहित प्रदेशातील व्यवहार पृथ्वीवरील व्यवहारासारखे नसतात. माणसाला वजनच राहत नाही. तो तरंगू लागतो. अक्षरश: रबरी चेंडूप्रमाणे उड्या मारू शकतो.

अंतराळ प्रयोगशाळेत राकेश शर्मा काम करत असताना तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी त्यांना म्हणाल्या,

''Yours is a historic endeavour and I hope it will make our country space conscious and make young people more adventurous.''

ज्या ज्या वेळी यान भारतावरून गेले त्या त्या वेळी भारताच्या साठ टक्के भूभागाची अनेक छायाचित्रे अंतराळवीरांनी घेतली. एवढ्याच भूभागाची हवाई छायाचित्रे घेण्यास आपल्याला दोन वर्षे लागली असती. ही छायाचित्रे शास्त्रीय नकाशा तयार करण्यास आणि नैसर्गिक साधनसामुग्रीच्या शोधासाठी उपयुक्त ठरली. त्यांचे कॅमेरे इतके प्रभावी होते की, त्या कॅमेऱ्यांनी माऊंट एव्हरेस्टवर चढाई करणाऱ्या गिर्यारोहकांचे छायाचित्रही टिपले आहे. यानाच्या खिडकीतून पृथ्वीकडे पाहिल्यानंतर राकेश शर्मा म्हणतात,

''सर्व पृथ्वी एकच दिसतेय, देशांच्या सीमा दिसत नाहीत, मग जग अशांत का?'' खिडकीतून बाहेर पाहिल्यानंतर त्यांना सर्वत्र काळोखाचे साम्राज्य दिसले. आकाशाच्या काळ्याकुट्ट छताला तारे व सूर्य लटकलेले दिसत होते. तिथे सूर्योदय-सूर्यास्त नव्हता.

राकेश शर्मांनी अंतराळ प्रयोगशाळेत काही प्रयोग केले. त्यातील प्रमुख प्रयोग होता मिश्रधातू करण्याचा. सामान्यपणे पृथ्वीवर दोन धातू वितळून त्यांच्यापासून चांगला मिश्रधातू तयार होत नाही, कारण गुरुत्वाकर्षणामुळे पृथ्वीवर द्रवात अभिसरण प्रवाह (Convection Currents) असतात. परंतु गुरुत्वाकर्षण विरहीत प्रदेशात अभिसरण प्रवाह नसल्याने तिथे उत्तम प्रकारचा मिश्रधातू तयार होतो. राकेश शर्मांनी जर्मेनियम व सिल्व्हर यांच्यापासून मिश्रधातू तयार केला. संरक्षण व अंतराळ उद्योगात त्याचा मोठ्या प्रमाणात उपयोग होत असतो.

सोयुझ टी -१० मधून हे अंतराळवीर पृथ्वीवर परत आले. सोयुझला तीन मोड्युल्स होते. कक्षेत फिरणारे मोड्युल, सर्व्हिस मोड्युल आणि पृथ्वीवर येणारे मोड्युल; ज्यात अंतराळवीर बसले होते. कक्षेत फिरणारे मोड्युल अवकाशात उडविले व त्यानंतर काही वेळाने सर्व्हिस मोड्युल उडविले. ही दोन्हीही मोड्युलस ज्यावेळी पृथ्वीच्या वातावरणात शिरली त्यावेळी जळून गेली. पृथ्वीवर येणाऱ्या मोड्युलला विशेष असे संरक्षक कवच असल्याने ते वातावरणात शिरल्यानंतर जळून गेले नाही. या संरक्षक कवचाची पंचवीस हजार डिग्री सेल्सिअस तापमानापासून संरक्षण करण्याची क्षमता होती. मोड्युलमधील अंतराळवीरांना या अग्निगोळ्याचा कोणताही त्रास झाला नाही. कारण आतील तापमान २० अंश सेल्सिअस इतके ठेवले होते. पॅराशूट व रेट्रोरॉकेटच्या

साहाय्याने ते अत्यंत कमी गतीने म्हणजे सेकंदाला तीन मीटर्स या वेगाने जमिनीवर सुरक्षित उतरले.

ही सर्व अंतराळ मोहीम व्यवस्थितपणे पार पडण्यामागे दोन वर्षांची तयारी होती. 'भारत-रशिया संयुक्त समानव यान मोहिमे'चा प्रस्ताव रशियाचे तत्कालीन अध्यक्ष लिओनिड ब्रेझनेव यांनी डिसेंबर १९८० मध्ये मांडला. त्यावेळी ते भारताच्या दौऱ्यावर होते. भारताने हा प्रस्ताव मान्य करून त्या प्रकल्पासाठी पावणेदोन कोटी रुपयांची तरतूद केली. या प्रकल्पास 'पवन' हे नाव देण्यात आले.

भारतीय हवाई दलाला या मोहिमेसाठी दोन उमेदवारांची निवड करण्यास सांगितले. त्यासाठी सुपरसॉनिक लढाऊ विमाने चालविण्यातील नैपुण्य आणि उच्च दर्जाची शारीरिक व मानसिक क्षमता या दोन कसोट्या लावण्यात आल्या. या कसोट्या वापरून १५० उमेदवार निवडण्यात आले. पुढे यातून विंग कमांडर रवीश मल्होत्रा आणि स्क्वॉड्रन लीडर राकेश शर्मा या दोघांची अंतिम निवड करण्यात आली. मल्होत्रांचा जन्म लाहोरचा व शिक्षण कोलकत्यात झाले. राकेश शर्मांचा जन्म १३ जानेवारी १९४९ ला पंजाबातील पतियाळा या शहरात झाला. त्यांचे शिक्षण हैद्राबादमध्ये झाले. १९६५ मध्ये त्यांनी एन.डी.ए.त प्रवेश घेतला. एन.डी.ए. मधून १९६८ साली त्यांनी पदवी संपादन केली. भारतीय वायुसेनेत त्यांनी १९७० मध्ये फाईटर वैमानिक म्हणून कारकीर्द सुरू केली. रवीश मल्होत्रांच्या नावावर विविध प्रकारची लढाऊ विमाने चालविण्याचा चौतीसशे तासांचा अनुभव होता तर राकेश शर्मांच्या नावे सोळाशे तासांचा अनुभव होता. दोघांनीही १९७१ च्या भारत-पाक युद्धात अनेक मोहिमा यशस्वीरीत्या पार पाडल्या होत्या. त्यांची अंतराळवीर म्हणून निवड झाल्यानंतर त्यांना मास्कोजवळील 'स्टार सिटी'त खास प्रशिक्षणासाठी पाठविले. या प्रशिक्षणात यान तंत्रज्ञान आणि यानाच्या प्रतिकृतीसंबंधी विविध चाचण्यांचा समावेश होता. शून्य गुरुत्वाकर्षणाची सवय होण्यासाठी त्यांना खास प्रशिक्षण देण्यात आले होते.

राकेश शर्मा कुटुंबवत्सल आहेत. त्यांना क्रिकेट खूप आवडते. फावल्या वेळात वाचन व संगीत ऐकणे ते पसंत करतात. शास्त्रीय संगीताच्या वाटेला ते जात नाहीत. साधे संगीत त्यांना आवडते. हॉटेलपेक्षा घरचे जेवण ते पसंत करतात. नाशिकमध्ये (एच ए एल, ओझर) त्यांचा बराच कालावधी गेला. नाशिककरांच्या दृष्टीने ही अभिमानाची गोष्ट आहे. विमानाची चाचणी घेत असताना त्यांच्या विमानाला अपघात झाला. सुदैवाने ते बचावले. ओझर येथील मतिमंद मुलांच्या संस्थेला त्यांनी सढळ हातांनी मदत केली. या कामात त्यांच्या पत्नी मधूजी यांचा मोठा सहभाग होता.

अंतराळ मोहिमेवरून परत आल्यानंतर भारत सरकारने या तीन अंतराळवीरांना 'अशोक चक्र' हा सन्मान दिला तर रशियन सरकारने शर्मांना 'हीरो ऑफ सोव्हिएत युनियन' व 'ऑर्डर ऑफ लेनिन' हे किताब दिले.

♣ ♣

– डॉ. निवास पाटील
'पल्सार' प्लॉट नं – ६, देवदत्त अपार्टमेंटसमोर,
गंगापूर रोड, नाशिक – १३

वेचक... वेधक...!

'वेलविट्शिया मिरॅलिस' ही जमिनीपासून थोडी उंच वाढणारी वाळवंटातली वनस्पती. हिची पानं वक्राकार असतात. काही पानं उभी फाटून त्यांची रचना पन्हाळ्यासारखी होते. रात्रीच्या वेळेस वाळवंटातलं तापमान एकदम थंड असतं. सर्वत्र धुकं पसरतं. तेव्हा धुक्याचं पाणी होऊन ते या पन्हाळ्यातून घरंगळत मुळांपर्यंत पोहोचतं, आणि झाडाला पाणी मिळतं. प्रखर सूर्यप्रकाशातही ही वनस्पती त्यामुळेच ताजी टवटवीत दिसते. हे पाणी प्यायला छोटे किडे, गोगलगायी या वनस्पतींच्या आसपास दिसतात.

। दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा ।

प्रायोजक – डॉ. कीर्ती आपटे, पुणे ☎ ९४२२०१७१७५

॥उजळली वाट॥

लेखांक – ५

स्वाध्याय प्रवचन

– डॉ. स्वर्णलता भिशीकर

प्रिय चारुहास,

मागच्या पत्रातून सांगितल्याप्रमाणे उपासनेला सुरुवात केलीस ना चारू? काय अडचणी येतायत? मला सविस्तर पत्राने कळव. सध्या तुम्ही मंडळी वार्षिक परीक्षेच्या अभ्यासाला जोरात लागला असाल. कधी आहे परीक्षा? या विद्याव्रत संस्कारातलं 'स्वाध्याय प्रवचन' हे एक महत्त्वाचं व्रत आहे, चारू. आत्ता या परीक्षेआधीची ही वेळ हे व्रत जाणून घ्यायला योग्य आहे. या पत्रातून याच व्रताबद्दल आपण जाणून घेऊयात.

बरेचदा अभ्यासाचं आणि परीक्षेतल्या गुणांचं काही तरी बिनसतं, असं वाटतं ना! म्हणजे अभ्यास चांगला झाला तरी गुण कमी पडतात कधी कधी, हो ना? असं का होत असतं बरं? काही वेळा प्रश्नाचा रोख आपल्याला कळत नाही. आवश्यकतेपेक्षा जास्त तरी आपण लिहितो किंवा कमी लिहितो. एखादा विषय कळला आहे असं वाटतं; पण थोडा वेगळ्याप्रकारे प्रश्न विचारला तर गोंधळल्यासारखं होतं. फक्त परीक्षेतल्या यशासाठी नाही चारू, तर विषय आपल्याला अगदी मुळातून नीट कळावा म्हणून विद्याव्रतातलं **स्वाध्याय प्रवचन** हे व्रत सांगितलं आहे. बऱ्याच लोकांची समजूत असते की प्रवचन म्हणजे देवाधर्माचं काहीतरी असलं पाहिजे. पण तसं नाही चारू. या दोन्ही शब्दांचा अर्थ आपण नीट समजून घेऊया.

स्वाध्याय म्हणजे स्वत: केलेला अभ्यास आणि एखादी गोष्ट आपल्याला चांगली समजली असली व आपण ती आपल्या मित्राला समजावून सांगितली तर त्याला म्हणायचे प्रवचन! म्हणजे आपण स्वत: जे समजून घेतो, जाणून घेतो तो स्वाध्याय आणि आपल्याला समजलेला अभ्यास आपण इतरांना योग्यरीतीने समजावून सांगतो त्याला म्हणायचं प्रवचन.

चारू, तुम्ही अभ्यास कसा करता रे? पुस्तकातला एखादा पाठ एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत वाचत गेलं म्हणजे आपल्याला वाटतं की झाला अभ्यास! पण खरा अभ्यास जरा सावकाशच करायचा असतो. पाठाचा एक भाग वाचायचा. मग डोळे मिटून आपण काय काय वाचलं ते आठवायचं. आपणच त्यावर आपल्याला प्रश्न विचारायचे. असं का? तसं का? त्यांची उत्तरंही मिळवायचा प्रयत्न करायचा. असा चौकस अभ्यास करायचा. आपल्या शब्दांत उत्तरं लिहायचाही प्रयत्न करायचा.

आपल्या अभ्यासातले काही तपशील हे आपल्याला लक्षातच ठेवावे लागतात, पाठ करावे लागतात. उदाहरणार्थ, विविध रासायनिक पदार्थांचे गुणधर्म. अशा गोष्टी नीट लक्षात राहाव्यात यासाठी त्या पुन्हा पुन्हा वाचाव्या लागतात, आठवाव्या लागतात, लिहून पाहाव्या लागतात.

परीक्षेतले काही प्रश्न हे आपल्या विचारशक्तीला किंवा कल्पनाशक्तीला चालना देण्यासाठी असतात. निबंधसुद्धा काही माहितीपर, काही कल्पनाप्रधान असतात. उदाहणार्थ - 'रायगड बोलू लागला तर...!' हा कल्पनाप्रधान निबंध आहे. 'प्रतापी शिवराय' हा चरित्रपर निबंध आहे. 'त्सुनामी लाटेचे किंवा भूकंपाचे परिणाम' हा माहितीपर निबंध आहे. आपण जुन्या प्रश्नपत्रिका वाचाव्यात. त्यातले निबंधाचे विषय लिहून ठेवावेत. आणि सवडीने एकेक प्रकारचा निबंध लिहून पाहावा. हा स्वाध्यायाचा एक प्रकार. यासाठी वर्तमानपत्रं, पुस्तकं तुम्ही वाचलेली हवीत. त्यातून वेगवेगळ्या प्रकारची माहिती तुम्हाला निबंधासाठी निवडावी लागते. मग त्यावर विचारप्रक्रिया करावी लागते. तुमच्यातल्या संवेदनशीलतेलाही चालना मिळते. आपल्या मनात असलेले विचार नेमक्या शब्दांत मांडण्याची सवय लागते.

भूक, थंडी, ऊन ज्यांनी सोसले हे सर्व ।
अन्न-वस्त्र-निवाऱ्याचे त्यांच्यासाठी नवे पर्व ॥

अभिव्यक्त होण्याची संधीही मिळते.

गणित, विज्ञान या विषयांमध्ये बुद्धीला आव्हान देणारे प्रश्न असतात. ते स्वत:च्या बुद्धीने सोडवण्याची सवय करावी लागते. आमचे एक शिक्षक म्हणत की, गाइडस्, मार्गदर्शिका यांचा वापर आपण कुबड्यांसारखा करतो. त्यामुळे दुसऱ्यांवर अवलंबून राहायची आपल्याला सवय लागते. गणित, विज्ञान शिकायचं ते आपली तर्कबुद्धी वाढण्यासाठी ! गाईड वापरून आपल्याला तर्काधिष्ठित विचार करण्याची सवय लागेल का?

म्हणून जो 'स्वाध्याय' करायचा तो स्वत:च्या स्वत: अनुभव घेऊन, शिकण्याच्या वेगवेगळ्या संधी स्वत: पुढे होऊन घेऊन ! म्हणूनच आपल्या अभ्यासात सच्चेपणा आणि सखोलपणा सुरुवातीपासूनच असणं महत्त्वाचं असतं. तर आणि तरच आपल्या मेंदूला चालना मिळते. तो सजग होतो. वेगवेगळे नवनवीन अनुभव घेण्याचा, अभ्यास करण्याचा उत्साह येतो. यातूनच आपलं व्यक्तिमत्त्व घडत असतं, चारू. आपण अनुभवसंपन्न होत असतो.

एका एम्बीएच्या महाविद्यालयातून काही विद्यार्थी प्रकल्प करायला माझ्याकडे आले होते. दोघेजण जैवविविधतेवर काम करत होते. त्यापैकी एकाने इथल्या वनस्पती पाहिल्या, पक्ष्यांचं निरीक्षण केलं, इथल्या लोकांना माहिती विचारली. त्यामुळे त्याच्या स्वत:च्या मनात त्याच्या प्रकल्पाचा आराखडा तयार झाला, तपशील स्पष्ट झाले. त्याने भरपूर परिश्रम केले, चौकसपणे माहिती गोळा केली आणि ती सुव्यवस्थितपणे मांडली. तिला 'गुगल'वरच्या माहितीची जोड दिली. दुसरा विद्यार्थी मात्र बाहेर फिरलाच नाही. फक्त संगणकावर त्याने इकडून तिकडून चार गोष्टी एकत्र केल्या. झाला झटपट प्रकल्प ! इंग्रजीत अशी म्हण आहे- There is no easy way to Success. 'यशाला 'शॉर्टकट' नसतो.' दुसऱ्या मुलाचा प्रकल्प जरी पूर्ण झाला असला चारू, तरी त्याला त्यातून काय मिळालं असेल बरं? त्याच्या ज्ञानात, अनुभवात काय भर पडली असेल, तू विचार करून बघ बरं ! जाणीवपूर्वक प्रयत्न केले तर आपल्यातल्या क्षमता ताणण्याची संधी 'स्वाध्याया'तून आपल्याला मिळत असते. यातून आपलाच विकास होत असतो.

लिहिणं, पाठांतर करणं, निबंध लिहिणं, गणित-विज्ञान शिकणं, प्रकल्प करणं याचबरोबर दुसऱ्याचं म्हणजे शिक्षक, मुख्याध्यापक, शाळेत येणारे पाहुणे-वक्ते यांचं ऐकणं ही श्रवणकला आहे. 'स्वाध्याय प्रवचन' व्रतात या कलेलाही महत्त्व आहे. वक्ता बोलत असताना वक्त्याच्या मनातली मुद्द्यांची साखळी आपल्याला कळावी लागते. त्यातली महत्त्वाची माहिती अचूक टिपावी लागते. त्यावर आपल्या मनात उमटणारे तरंग थोडावेळ बाजूला ठेवून सांगणारा काय सांगतो आहे, हे लक्षपूर्वक ऐकावं लागतं.

अभ्यासाचं कौशल्य साधी माहिती एकत्र करणं इथपासून सुरू होतं. माहितीचं वर्गीकरण करणं, त्यातून निष्कर्ष काढणं; त्या निष्कर्षाचा उपयोग करून नवीन तंत्र शोधून काढणं, ती सदैव सुधारत राहाणं; या पद्धतीने स्वाध्याय होतो. मोबाइल, आयपॉड वगैरे आधुनिक साधनं आता सर्वांकडेच असतात. पण मोबाइल काम करतो कसा? तो दुरुस्त कसा करायचा? याबद्दल जिज्ञासा थोड्याच लोकांना असते. जिज्ञासा निर्माण झाली तरी प्रत्यक्षात कोणाकडे तरी जाऊन शिकण्याची प्रेरणा कमी असते. कित्येक विद्युत उपकरणं आपण वापरतो. पण त्याबद्दल आपल्याला अगदी कमी माहिती असते. स्वाध्याय म्हणजे केवळ अभ्यासाची पुस्तकं वाचणं नव्हे तर हातांनी वस्तू जोडणं आणि मोडणं (सोडवणं), त्या वस्तूच्या भागाचं कार्य; त्यांची परस्परांशी असलेली नाती समजून घेणं म्हणजे स्वाध्याय! शिवाय कुंभार, चांभार, सुतार यांचं काम बघणं, त्यांच्याशी गप्पा मारणं यातूनही आपण खूप काही शिकत असतो. अनेक ज्येष्ठ व्यक्तींच्या सहवासातून, त्यांच्या अनुभवातूनही आपल्याला प्रेरणा मिळत असते. एवढंच काय पण चांगली पुस्तकं, उत्तम चित्रपटही आपलं ज्ञान वाढवतच असतात. सतत नवनवीन गोष्टी पाहण्याची, करण्याची, शिकण्याची ऊर्मी आपल्या मनात सतत जिवंत मात्र असायला हवी. चारू, तुला आता कळलं असेल विद्याव्रत संस्कारात 'स्वाध्याय' या शब्दाचा किती व्यापक अर्थ दडला आहे ! केवळ गुण मिळवण्यापुरतं शिकणं म्हणजे शिकणं नव्हे, चारू. असं परीक्षार्थी बनणं तुलनेनं सोपं असलं तरी आयुष्यभर ते

। दिनविशेष... १७ मार्च - जागतिक अपंग दिन ।
प्रायोजक – श्री. सुधीर विष्णु दफ्तरदार, पुणे

'स्वाध्याय प्रवचन' हे व्रत हळूहळू आचरणात आणण्यासाठी कोणते संकल्प कराल?

* वर्गात शिक्षक शिकवत असताना मी ते जाणीवपूर्वक, लक्ष देऊन ऐकेन.
* महिन्याभरातून एखादं तरी पाठ्यपुस्तकाशिवायचं पुस्तक वाचेन.
* मला समजलेला भाग इतरांनाही समजावून सांगेन.
* निबंधलेखन, वक्तृत्व इ. स्पर्धांमध्ये मी आवर्जून भाग घेईन.
* मला न आवडणाऱ्या विषयाचाही मी जाणीवपूर्वक अभ्यास करेन.

ज्ञान आपल्यापाशी टिकत नाही. उलट मुळापासून जाणून घेत, समजून-उमजून केलेला अभ्यासच शेवटपर्यंत टिकतो. मग परीक्षेत प्रश्न कसाही विचारला असला तरी त्याचं नेमकं उत्तर आपल्याला सहज लक्षात येतं.

या स्वाध्यायानंतरची पुढची पायरी म्हणजे प्रवचन! 'आढ्यात नसेल तर पोहऱ्यात कुठून येणार?' या अर्थाची एक म्हण आपल्याकडे प्रचलित आहे. तसं जेवढा तुमचा स्वाध्याय खरा, प्रामाणिक, पक्का तितकं तुमचं प्रवचन प्रभावी, मुद्देसूद होतं, पटतंय ना चारू? आतापर्यंत शिकलेलं, जाणवलेलं, कळलेलं ज्ञान दुसऱ्यांपर्यंत आपल्याला पोहोचवता आलं पाहिजे. एवढंच नाही तर ते दुसऱ्याला कळेल, पटेल अशा स्वरूपात सांगता आलं पाहिजे, हो ना? त्यासाठी सराव आवश्यक असतोच.

तुम्ही जेव्हा स्पर्धा परीक्षेच्या जगात उतरता तेव्हा आपलं ज्ञान नेटकेपणाने, प्रभावीपणाने मांडता येण्याची कलाही शिकावी लागते. मुलाखतीत आपले विचार मुद्देसूद मांडण्याला खूप महत्त्व असतं. म्हणून स्वाध्यायाबरोबरच प्रवचनाचा म्हणजे विचार मांडणीचा सराव फार आवश्यक असतो. स्वच्छ, खणखणीत बोलता येणं, मुद्दे सुसंगत रीतीने जुळलेले असणं, सभाधीटपणा हे प्रवचनासाठी आवश्यक गुण तुम्ही आत्तापासूनच हळूहळू अंगी बाणवून घ्यायला हवेत.

विद्याव्रत घेणाऱ्या विद्यार्थ्याने अभ्यास करण्याची कला (लर्निंग टु लर्न) ही शिकायलाच हवी. कारण ती आयुष्यात सर्व प्रसंगांत उपयोगी पडते. लोकमान्य टिळक मंडालेला सहा वर्षं 'एकान्तवासाची' शिक्षा भोगत होते. दुसऱ्या एखाद्यावर या शिक्षेचा विपरित परिणाम झाला असता. पण टिळकांना स्वाध्यायाची आवड होती. वाचन-चिंतनातून त्यांनी 'गीतारहस्य' सारखा अपूर्व ग्रंथ तयार केला. अशी आहे महती स्वाध्याय-प्रवचनाची! चारू आता तुझा अभ्यास तू अधिक डोळसपणे करशील, याची खात्री आहे मला. त्यासाठी तुला अगदी मनापासून शुभेच्छा!

तुझी
लताताई

♣ ♣

डॉ. स्वर्णलता भिशीकर
ज्ञान प्रबोधिनी, हराळी, डाक तोरंबा,
ता. लोहारा, जि. उस्मानाबाद

प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट
अधिनियम ११ बी अन्वये प्रसिद्ध करावयाची
माहिती अर्ज क्र. ४ (नियम ८ प्रमाणे)

वृत्तपत्राचे नाव : छात्र प्रबोधन
प्रसिद्धी काळ : मासिक
संपादक, प्रकाशक व मुद्रकाचे
नाव व पत्ता : प्रा. महेन्द्र सेठिया,
ज्ञान प्रबोधिनी,
५१० सदाशिव पेठ, पुणे ३०.
राष्ट्रीयत्व : भारतीय
मासिकाची मालकी : ज्ञान प्रबोधिनी,
५१० सदाशिव पेठ, पुणे ३०.

मी महेन्द्र सेठिया असे जाहीर करतो की, वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी आहे.

पुणे
सौर १ फाल्गुन शके १९३३ **(महेन्द्र सेठिया)**
(२० फेब्रुवारी २०१२) **संपादक, छात्र प्रबोधन**

अभिमान घेऊनी कुठे जायचे सांगा ।
किती लांब पोचल्या गर्विष्ठांच्या रांगा ।।

काही नवे लक्षवेधी...

सौर माघच्या (फेब्रुवारी २०१२) अंकापासून तुम्हाला अंकाच्या मांडणीत काही वेगळेपणा जाणवतोय का? बघा बरं तो अंक आणि हा सौर फाल्गुनचा अंक चाळून! अगदी बरोबर. या दोन्ही अंकांची मुखपृष्ठं आणि मलपृष्ठं चाररंगी आहेत.

* छात्र प्रबोधनच्या मान्यवर चित्रकारांच्या खास चित्रशैलीतील चाररंगी चित्रं तुम्हाला आता आगामी मुखपृष्ठांवर पाहायला मिळतील. शिवाय या चित्रकारांचा अल्पपरिचयही अंकात असेल.
* मलपृष्ठावरील 'क्लिक करण्यापूर्वी' या सदरातील प्रकाशचित्रं आवडली का? त्या प्रकाशचित्रांसंबंधीचा मजकूर त्या त्या पानावर जाऊन तुम्ही मुद्दामहून वाचला पाहिजेत. प्रकाशचित्र स्वत: काढताना त्यातल्या काही बाबींवर (म्हणजे प्रकाशयोजना, विषय, प्रमाणबद्धता इ. इ.) विचार केला पाहिजे. आणि महत्त्वाचं म्हणजे कॅमेऱ्याबद्दलच्या शंका महामुनीसरांना जरूर विचारल्या पाहिजेत. 'कॅमेऱ्याबद्दल' तपशीलवार माहिती आपण सौर चैत्र अंकातून वाचणार आहोतच!
* हे वर्ष स्वामी विवेकानंदांचे शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे; हे आता तुम्हाला माहीत आहेच. त्यामुळे त्यांच्यावर लिहिली गेलेली वेगवेगळी गीतं आणि त्यातून सांगितलेले विचार आपण जाणून घेणार आहोत. शिवाय स्वामी विवेकानंदांचे काही निवडक विचार आणि ते विचार आज कृतीत आणण्यासाठी आपण काय करू शकू, यासंबंधीच्या कृतीही जाणून घेणार आहोत. त्या कृती आपल्या आचरणात आणण्याचा आपण जरूर प्रयत्न केला पाहिजे. मलपृष्ठाच्या आतील पानावर हा मजकूर आपण देणार आहोत. शिवाय स्वामीजींचं जीवनकार्यही सौर चैत्र अंकातून आपल्याला वाचायला मिळणार आहे.

मुखपृष्ठ चित्रकार

नाव : भास्कर सगर
जन्म : १ जानेवारी १९७१ (लातूर)
शैक्षणिक पात्रता : जी.डी. आर्ट (अप्लाइड आर्ट) १९९२; अभिनव कला महाविद्यालय, पुणे.

सगळ्याच चित्रकारांना भुरळ पाडणारा निसर्ग, चित्रकार भास्कर सगर यांच्या चित्रातलाही महत्त्वाचा घटक! निसर्गातील वेगवेगळे विलोभनीय आविष्कार त्यांना नेहमीच मोहित करतात. कोकण, किल्ले, लेणी, वास्तू या चित्रमालिकांद्वारा निसर्गातल्या वेगवेगळ्या आविष्कारांना त्यांनी चित्रबद्ध केलं आहे. मुखपृष्ठावरील चित्र त्यांच्या 'कोकण' या चित्रमालिकेतील आहे.

निसर्गातील या विभ्रमांचे जलरंगासारख्या प्रवाही माध्यमात रेखाटन करणे हे भास्कर सगर यांचे खास वैशिष्ट्य. रंग ओला असतानाच अर्ध्या ते तीन तासात चित्र पूर्णत्वास नेणं जलरंगात महत्त्वाचं असतं. निसर्गात जाऊन दृश्य चित्रित करताना हे कमीत कमी वेळात चित्र पूर्ण करण्याचं जलरंगाचं माध्यम प्रभावी ठरतं. 'Wet in wet & Wet in dry' या पाश्चिमात्य चित्रशैलीत काम करणं, हे सगर यांचे खास वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

आत्तापर्यंत महाराष्ट्रभरात त्यांची २५ पेक्षा जास्त ठिकाणी चित्र प्रदर्शनं भरली आहेत. त्याचबरोबर 'द इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग', 'रोटरी क्लब', 'विद्यार्थी साहाय्यक समिती', 'अभिनव कला महाविद्यालय', 'स्टेट लेव्हल हँडीक्राफ्ट एक्झिबिशन' इ. संस्थांकडून पुरस्कार मिळाले आहेत.

८- शांताई प्लाझा, ७१५, सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे 411030, artistbhaskar@yahoo.com

। अभिनंदन... ज्येष्ठ कथाकार भारत सासणे - लाभसेटवार साहित्य सन्मान पुरस्कार।

प्रायोजक - श्री. अजित भिडे (डायरेक्टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि.), पुणे

प्लीज, समजून घ्या नं मला...

शी बाबा! हा अभ्यास करून करून अगदी वैताग आलाय. असं वाटतं खूप खेळावं, चांगले एक-दोन महिने या पुस्तकं-वह्यांना हातही लावू नये. पण छे छे... असा विचारही मी करू शकत नाही. दहावीत आहे ना मी! आणि आता तर डिसेंबर-जानेवारी-फेब्रुवारी तीनच महिने राहिलेत. त्यामुळे अभ्यास -अभ्यास आणि अभ्यास!

तरी बरं आज घरात कोणीच नाही. सगळेजण काकांकडे पूजेसाठी गेलेत आणि मी बसलेय घरात दहावी म्हणून. तरी बरं आत्ता स्वत:शी तरी बोलता येतंय. नाहीतर जरा पुस्तकातून मान हलली की, लगेच आईची बडबड सुरू... 'स्वप्ना, लक्ष कुठंय? अभ्यास कर. आम्ही राब-राब राबतो, कष्ट करतो, तुला एवढी पुस्तकं आणून दिलीत, महागडा क्लास लावलाय', पॅ पॅ पॅ... (चिडवून दाखवते.)

माझे एवढे छान केस; पण कापून टाकले. म्हणे वेण्या घालण्यात जास्त वेळ जातो. दहावीचं वर्ष आहे. काही झालं की हे 'वर्ष' मध्ये येतं. हो, शाळेबाहेरचा गोळा खाऊ का विचारलं की, 'नको दहावीचं वर्ष आहे, आजारी पडशील', 'आई, वडा खाऊ?' 'नको पुढच्या वर्षीपासून काय हवं ते कर.' 'मग दादा कसा जातो?' 'तो मोठाय ना? आणि तो मुलगा आहे, तू मुलगी.' का फरक करतात असा?

खरंच नववीपासून ही दहावीची कटकट सुरू आहे. सारखं आपलं भीती घालणार - 'स्वप्ना, पुढच्या वर्षी दहावी आहे हं.' माझी चित्रकला बंद केली. टि.व्ही. बंद. खेळणं बंद. शाळेत आम्हाला शिकवतात, अनुभव हेच शिक्षण. मुलांना खेळू द्यावं, त्यांच्यात कला असाव्यात आणि घरी फक्त गृहपाठ. लिहून लिहून बोटं तुटायची पाळी आलीये.

मला मान्य आहे, अभ्यास महत्त्वाचा आहे, टक्के मिळाले नाही तर चांगलं कॉलेज नाही मिळणार. स्पर्धा वाढली आहे, पण आई-बाबा माझ्यावर खूप ताण येतोय हो. तुम्ही माझ्याकडून ८५ टक्क्यांवरची अपेक्षा ठेवताय. एवढे टक्के मिळाले तर नवा मोबाईल घेऊ, सायकल घेऊ असं सांगताय, पण खरंच एवढी माझी झेप मोठी आहे का? ... मला भीती वाटते खूप... दडपण येतं. वाटतं, तुमच्या अपेक्षांना मी पुरी पडेन ना? मला तुम्हाला दु:खी झालेलं बघायचं नाहीये. मला आपली परिस्थिती माहीत आहे. आई, तू खूप काम करतेस. बाबा तुम्हीसुद्धा खूप वेळ घराबाहेर असता... हे सगळं आम्हा मुलांसाठीच आहे, हे माहीत आहे मला.. पण प्लीज, समजून घ्या नं मला. नाही झेपत हे मला... मला नवा ड्रेस नका घेऊ, नवी पुस्तकं नका आणू... दोन क्षण माझ्यासोबत बसा... माझ्याशी बोला. माझ्यासाठी करता करता... मला विसरून जाताय तुम्ही! शाळेत कित्ती धम्माल होते, आम्ही मैत्रिणी-मैत्रिणी काय-काय बोलतो. मला सायन्स साइडला मुळीच जायचं नाहीए. मला कॉमर्स आवडतं.. मला हे सगळं तुमच्याजवळ बोलावंसं वाटतं,... पण भीती वाटते - तुम्ही ओरडाल - माराल. तुम्ही समजूनच घेणार नाही, असं वाटतं. एकाच घरात राहतो आपण; पण किती दूर जातोय आपण एकमेकांपासून.

लहानपणी तुम्ही किती वेळ द्यायचात मला. बाबा, तुम्ही मला फिरायला घेऊन जायचा, आई, तू गोष्टी सांगायचीस. आता का हे सगळं बदललं... मी मोठी झाले म्हणून! मग नको हे मोठेपण! देवा सत्य नारायणा, बुद्धी देरे बाबा-मला नाही, माझ्या आई-बाबांना!

आई-बाबा, प्लीज समजून घ्या ना मला! मला तुमच्याशी खूप बोलायचंय.. (दरवाजाकडे बघत) बापरे, बेल वाजली - आले वाटतं आई-बाबा!

♣♣ – **नमित चित्रे,** १३, ओमकार निवास, कृ. बा. चितळे पथ, मुंबई – 28

अवघड वाटेवरती काटे, खाचा-खळगे किती ।
नको तमाची भीती, पाहुया दूरामधली ज्योती ।।

नवा दोस्त

कमल राजाज्ञा

''ठरलं तर मग. संध्याकाळी फुटबॉल आणि क्रिकेट आणि दुपारी अभयच्या घरी''

''दंगाऽऽ-'' सुनीलने त्याचे वाक्य पुरे केले. राजहंस कॉलनीतील मुले मैदानावर दिवाळीच्या सुट्टीतील कार्यक्रम आखत होती.

अभय उड्या मारतच घरी आला. अभयचे बालपण न्यू जर्सीत गेले होते. दीड वर्षांपूर्वीच त्याच्या वडिलांनी कोल्हापूरला स्वत:चा व्यवसाय सुरू केला होता. आणि त्याच्या बाबांनी सहा महिन्यांपूर्वीच राजहंस कॉलनीत घर घेतले होते. बहुतेक मुलांच्या घरी आजी-आजोबा होते. दुपारच्या वेळी त्यांची विश्रांतीची वेळ असल्याने घरी दंगा केलेला चालायचा नाही. अभयला आजोबा, आजी नव्हतेच. त्यामुळे सुट्टीच्या दिवशी त्याच्या घरी धुडगूस घालायला मोकळीक होती.

''अभय, चल तुझं सामान भरून टाक.'' त्याला पाहताच आई म्हणाली.

''आत्ताच? अगं, मी परवा दिवशी जाणार आहे शिबिराला.'' अभय म्हणाला.

''ऐक अभय. बाबांचा फोन आला होता मघाशी. उद्या येताहेत बाबा पुण्याहून. येताना त्यांच्या मामांना आणणार आहेत बरोबर. आपल्याकडं महिनाभर राहणार आहेत ते.'' आई म्हणाली.

''सुट्टीत महिनाभर?''

अभय ओरडलाच.

''ओरडू नकोस. ते असेपर्यंत तुमची भांडणं, दंगा चालणार नाही घरात. पिंकीलाही सांगितलंय मी. अरे, त्यांचं घर आहे इथे कोल्हापूरजवळच कुठंतरी. ते चांगल्या किमतीला विकलं जातंय. त्यांच्या ओळखीचे डॉक्टर मिरजेला त्यांचं डोळ्याचं ऑपरेशनही करणार आहेत आत्ताच,'' आई म्हणाली.

सुट्टीतले बेत फिसकटले म्हणून अभय नाराज झाला. कसे असतील हे आजोबा? 'राजूच्या आजोबांसारखे रागीट तर नसतील? 'सोफ्यावर काय लोळतोस सारखा? टी.व्ही. कसला बघतोस?' असं ते येताजाता रागावतील का? मुन्नीच्या आजीसारखं त्यांना हाताला धरून बागेत फिरवावं लागेल का?' असे अनेक प्रश्न त्याच्या मनात आले.

दुसरे दिवशी सकाळी मामाआजोबा आले. गोरे, बारीक, डोक्यावर तुरळक केस आणि डोळ्यावर जाड चष्मा. जेवण झाल्यावर ते झोपायला गेले. बाबा म्हणाले,

।अभिनंदन... थॅलेसेनियाग्रस्त लोकांसाठी काम करणारे श्री. जतिन सेजपाल - संघर्ष सन्मान पुरस्कार।

प्रायोजक –स्टॅटफिल्ड इक्विपमेंट, पिरंगुट, पुणे

''अभय, मी फॅक्टरीत गेल्यावर आजोबांशी बोलत बस.''

''मी काय बोलू त्यांच्याशी?'' अभय कुरबुरला.

''तेच बोलतील तुझ्याशी. खूप वाचन आहे त्यांचं.'' बाबांनी मग त्यांच्याबद्दल बरंच काही सांगितलं.

दुसरे दिवशी शिबिराला जाताना अभयने आजोबांना नमस्कार करून म्हटले,

''शिबिराला जातोय आजोबा, रामलिंगला.''

''रामलिंग? बेलवाडी जवळचं का?'' आजोबांनी उत्सुकतेनं विचारलं.

''माहीत नाही'' असं म्हणून अभय पळाला.

***

रामलिंग डोंगरावर वसलं होतं. पठारावर तंबूत राहायचे; वर मोकळे आकाश, खाली झाडीने भरलेली हिरवी दरी. कधी खडा डोंगर चढायचा तर कधी ओढा ओलांडायचा. धनेश, हळद्या, फुलचुखी सारख्या पक्ष्यांच्या हालचाली निरखायच्या, त्यांचे फोटो घ्यायचे. खूप मजा आली शिबिरात. शेवटच्या दिवशी भावेगुरुजी त्यांना घेऊन रामलिंगाच्या देवळात गेले. तेथे भावे गुरुजींना त्यांच्या परिचयाचे कुणी भेटले. बेलवाडीत काही कामानिमित्त आले होते.

''पोरांनो, हे डॉक्टर रमेश. आणि हा त्यांचा मोठा भाऊ सुरेश. हे दोघेही माझे विद्यार्थी होते.'' गुरुजींनी ओळख करून दिली.

''चला, आमच्याबरोबर तंबूत राहा आजची रात्र.'' गुरुजी त्यांना म्हणाले. डॉ. रमेश आनंदाने तयार झाले. रात्री शेकोटीभोवती गप्पा मारताना ते म्हणाले,

''मी इथं का आलो होतो ते सांगतो. माझं लहानपण खालच्या बेलवाडीत गेलं. माझे वडील एका जमीनदाराच्या शेतांचे व्यवहार बघत असत. मला, दादाला व ताईला चांगलं शिक्षण मिळावं म्हणून आईबाबा व आजी खूप कष्ट करत. आईला दम्याचा त्रास होता. तरीही ती व आजी लोकांची पापड-लोणची करून वडिलांना मदत करत. दादा व ताई रोज बसनं कोल्हापूरला शाळेला जात. मी बेलवाडीच्याच शाळेत होतो.

खेडेगावात जागेला किंमत नसते. एका मोठ्या घरात आम्ही भाड्यानं राहात होतो. आमचे घरमालक पुण्यात असत. त्यांचे चुलतभाऊ-आप्पासाहेबच घराकडं बघायचे. दादाची बारावीची परीक्षा पंधरा दिवसांवर आली होती. ताईची नववीची, माझी चौथीची परीक्षाही जवळ आली होती. आईच्या दम्याने उचल खाल्ली होती. बाबा धान्याच्या विक्रीत गुंतले होते. अशातच आप्पासाहेबांचा निरोप आला; घराला चांगली किंमत मिळतेय, घराच्या मालकांना दोन दिवसात घर विकायचे होते.

आमची परिस्थिती गावात सर्वांना ठाऊक होती. तीनतीन महिन्याचे भाडे तुंबायचे. आम्हाला घर देणार कोण? घर शोधायला, बदलायला वेळ तरी कुणाला होता? आईबाबांचा धीरच सुटला. घरमालक आले. घरविक्रीबाबत बोलणी झाली आणि फिसकटली, एवढंच आम्हाला कळलं दोन दिवसांनी बाबा घरी आले. त्यांचे डोळे पाण्याने भरले होते. आजीला ते म्हणाले,

''आई, मालकांनी आपल्यासाठी घर विकायचं रद्द केलं. सुरेशला बारावीची परीक्षा झाल्यावर ताब्यात देऊ, म्हणाले.''

''आप्पासाहेबांनी आपल्या परिस्थितीबद्दल मालकांना सांगायला नको होतं.'' आई म्हणाली.

''मीही तसंच म्हटलं. तेव्हा म्हणाले, ''दादानं विचारल्यावर मला सांगणं भाग होतं. नंतर कळलं असतं तर जन्मभर तळमळत राहिला असता तो.'' बाबा म्हणाले.

''अशी देवमाणसे खूप कमी असतात बाबा पण त्यांच्याही दोन मुली आहेत. त्यांचं शिक्षण आहे, लग्नं आहेत. तेही काही श्रीमंत नाहीत. तू फोन कर त्यांना. आपल्यासाठी त्यांना कशाला उगीच त्रास?'' आजी बाबांना म्हणाली.

बाबांनी फोन केला.

''आमची काळजी करू नका,'' घरमालक म्हणाले,

शब्द-बाण ओठातुन सुटले, मने किती घायाळ ।
फुंकर मारून जखम सुकविण्या किती लागला काळ ।।

''घराच्या समस्येचा तुमच्या मुलाच्या परीक्षेवर-पर्यायानं, त्याच्या व तुमच्याही आयुष्यावर परिणाम झाला असता. आपली गरिबी आपल्या प्रगतीच्या आड येतेय, असं वाटून मुलांच्या मनात नैराश्य, चीड उत्पन्न झाली असती. तुमच्या मुलांचा सद्सद्विवेक-बुद्धीवर, चांगुलपणावर विश्वास राहावा, म्हणून हा निर्णय मी घेतला. त्या विश्वासापुढं दोनतीन लाखांची काय किंमत !''

डॉ. रमेश सद्गदित होऊन थांबले.

''अजून घर तुमच्याकडंच आहे?'' गुरुजींनी विचारले.

''हो. आम्ही शिकायला बाहेर पडलो. आजी गेली. घर आहे तसंच आहे. खेड्यात जागेला महत्त्व नाही. आज ते घर बघायलाच आलो होतो मी. आम्ही विकत घेतोय ते.'' डॉ. रमेश म्हणाले.

''काय करणार रे त्या घराचं?'' गुरुजींनी विचारले.

''आमचे घरमालक आज एकटे आहेत. वृद्धाश्रमात राहतात. मुलींसाठी खूप खर्च केला त्यांनी. पण आता मुलींजवळ जाऊन राहणं त्यांना पटत नाही. त्यांचे उरलेले दिवस आरामात जावेत, हा मुख्य उद्देश.

दुसरं म्हणजे त्याठिकाणी गरिबांसाठी एक वृद्धाश्रम काढायचा आम्हा भावंडांचा विचार आहे. आमचे अनेक मित्रही मदत करणार आहेत. सरकारी दवाखान्यात काम करताना म्हाताऱ्या माणसांच्या शारीरिक आणि मानसिकही यातना पाहिल्यात आम्ही. घरच्यांना वाटतं, आज ना उद्या ही मरणारच. यांच्या औषधपाण्यावर खर्च कशाला करायचा? काही म्हाताऱ्या पेशंटना घरचे भेटायला यायचेच नाहीत. एकदा दवाखान्यात आणून टाकलं की झालं. म्हातारी माणसं शेतात, रस्त्यावर राबताना दिसली की फार वाईट वाटतं मला. आमच्या घरमालकांचं डोळ्याचं ऑपरेशन आज-उद्या एवढ्यात आहे. त्यानंतर खरेदीपत्र करूनच परत जाणार आहे मी.'' डॉक्टर रमेश बोलायचे थांबले.

गुरुजी म्हणाले, ''पाहिलंत मुलांनो, आज दुबळे वाटणारे वृद्ध कसे असतात? किती त्याग केलेला असतो; किती कष्ट केलेले असतात त्यांनी मुलांसाठी. घरी, शेजारी, बाजारात, स्टँड-स्टेशनवर तुम्हाला वृद्ध माणसे भेटत असतील. त्यांना आदरानं वागवा; मदत करा. त्यांचे कष्ट कमी करा.''

अभयचा घसा दाटून आला होता. त्याला वाटत होते, सर्वांना सांगावे, 'ते डॉ. रमेश सरांचे घरमालक म्हणजे माझे मामाआजोबा आहेत.'

***

अभय घरी पोचला. आजोबांचे ऑपरेशन झाले होते. दुपारी मिरजेहून यायचे होते ते. अभयने आपल्या खोलीत आजोबांची व्यवस्था केली. त्यांच्यासाठी तक्क्या, आरामखुर्ची आणून ठेवली. आजोबा आल्यावर तो त्यांना ओढत खोलीत घेऊन गेला,

''आजोबा ही आपली दोघांची खोली.'' तो म्हणाला. आजोबा हसले. त्यांनी त्याच्या हातात बुद्धिबळाचा संच दिला.

''तुम्ही खेळणार माझ्याशी?'' अभयने विचारले,

''हो तर. तुझ्याशी बुद्धिबळ आणि पिंकीशी फुटबॉल.''

असे म्हणून आजोबांनी पिंकीसाठी आणलेली भेट उघडली- बोटात घालायचे बूट आणि द्राक्षाएवढा फुटबॉल. सर्वांना हसू आले. अभयला त्याचा नवा दोस्त एकदम आवडला.

♣ ♣

कमल राजाज्ञा
'श्रीराम', पाटील प्लॉट,
शिवाजी नगर, बार्शी 416013

। दिनविशेष... २१ मार्च - जागतिक हवामान दिन।

प्रायोजक – व्ही. व्ही. आर्किटेक्ट, प्रा. लि., पुणे

महाराष्ट्राची साहित्य पंढरी - महाराष्ट्र साहित्य परिषद

प्रा. मिलिंद जोशी

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ही महाराष्ट्रातील आद्य साहित्य संस्था आहे. मराठी भाषा, साहित्य संस्कृती आणि समीक्षा यांचे जतन आणि संवर्धन करण्याचे काम ही संस्था १०६ वर्षाहून अधिक काळ करीत आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात लोकहितवादी आणि न्या. रानडे यांनी ग्रंथकार संमेलने सुरू केली. पुण्यात २६ आणि २७ मे १९०६ रोजी चौथे ग्रंथकार संमेलन विद्वान कवी गो. वा. कानिटकर यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. नागनाथ पाराजवळच्या मळेकर वाड्यात भरलेल्या या संमेलनात लोकमान्य टिळकांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. २७ मे रोजी समारोपाच्या दिवशी न. चिं केळकर यांनी 'आज रोजी 'महाराष्ट्र साहित्य परिषद' स्थापन झाली आहे', अशी घोषणा केली. त्याला लोकमान्य टिळकांनी पाठिंबा दिला. तेव्हापासून 'मसाप' पुण्यात साहित्य संस्कृतीच्या क्षेत्रात भरीव कामगिरी करण्यासाठी सज्ज झाली.

'मसाप'ची टिळक रस्त्यावरची जी वास्तू आज दिसते तशी ती १९३७ पर्यंत अस्तित्वात नव्हती. तिची उभारणी टप्प्याटप्प्याने करण्यात आली आहे. आज 'मसाप'च्या महाराष्ट्रात ५५ शाखा असून ९००० हून अधिक आजीव सभासद आहेत. 'मसाप'च्या माधवराव पटवर्धन सभागृहात वेगवेगळ्या मान्यवर साहित्यिकांचे स्मृतिदिन, वेगवेगळ्या विषयांवर व्याख्यानं, चर्चासत्रं, परिसंवाद, कविसंमेलनं, मुलाखती, मेळावे असे कार्यक्रम नेहमी होत असतात. समाजात घडणाऱ्या वेगवेगळ्या साहित्यिक घटनांची 'मसाप' साक्षीदार आहे. तसेच आधुनिक साहित्याचे भरणपोषण करण्याचे, त्याला प्रवाही बनवण्यासाठीही 'मसाप' कृतिप्रवण आहे. तिथे लावण्यात आलेली वेगवेगळ्या साहित्यिकांची छायाचित्रं हासुद्धा अनेकांच्या आकर्षणाचा विषय असतो.

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे वा. गो. आपटे संदर्भ ग्रंथालय हे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे आणखी एक खास वैशिष्ट्य ! ५०,००० जुने-नवे ग्रंथ, दुर्मिळ नियतकालिके, सर्व प्रकारचे कोश, संदर्भ ग्रंथ यांमुळे हे ग्रंथालय संशोधक आणि अभ्यासकांच्या कुतूहलाचा विषय बनले आहे. विविध वाङ्मय प्रकारातील उत्तम साहित्यकृतींना परिषदेतर्फे पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. 'मराठी भाषा आणि साहित्य' यांच्या अध्ययनाच्या प्रसारासाठी १९३८ पासून परिषदेतर्फे विविध स्तरांवरील परीक्षांचे आयोजन करण्यात येते. या सर्व महत्त्वपूर्ण उपक्रमांबरोबर सामाजिक बांधिलकीचे भान राखून परिषदेने 'साहित्यिक साहसनिधी' उभारला आहे. अपंग, वृद्ध, निराधार अशा साहित्यिकांना या निधीतून दरमहा मानधन देण्यात येते.

१९६१ साली पुण्याच्या साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष दत्तो वामन पोतदार यांच्या पुढाकाराने अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची स्थापना करण्यात आली आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने भरवायला महामंडळाने प्रारंभ केला. पण महामंडळाच्या स्थापनेपूर्वी १९६४ पर्यंतच्या ४५ साहित्यसंमेलनाचे काम 'मसाप'ने

हे कुठले-कुठले ओहळ आले भेटायला तुला ।
खळखळ वाजू दे ग सरिते, तुझ्या पायीचा वाळा ।।

केले. मराठी वाङ्मयाचा इतिहास आरंभापासून ते २००० सालापर्यंत प्रकाशित करणारी 'महाराष्ट्र साहित्य परिषद' ही महाराष्ट्रातील एकमेव साहित्य संस्था आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषद काळाची पावले ओळखून बदलत चालली आहे. आज एकूणच गतिमान झालेली जीवनशैली, तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव आणि प्रसार माध्यमातून उपलब्ध झालेले नानाविध रंजनाचे पर्याय यामुळे तरुण पिढी साहित्यापासून दूर जाताना दिसते आहे. या युवा पिढीला साहित्याकडे आकर्षित करण्यासाठी परिषदेने 'युवा मुक्त मंचा'ची स्थापना केली. यावर्षी परिषदेने १०६ वर्षांच्या इतिहासात प्रथमच 'युवा साहित्य/नाट्य संमेलन' घेतले. त्यानिमित्ताने उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा आणि एकपात्री अभिनय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून या संमेलनाला उदंड प्रतिसाद मिळाला. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ अच्युत गोडबोले होते. 'आम्ही काय वाचतो आणि का वाचतो' या विषयावर युवा पिढीच्या प्रतिनिधींनी व्यक्त केलेले मनोगत ऐकून, तरुण पिढी सर्व प्रकारचे साहित्य किती गांभीर्याने वाचते आहे, हे ऐकून समाधान वाटले. या संमेलनात समाजकारणातली तरुणाई आली होती. त्यांच्या बोलण्यावर युवापिढीने ज्या पद्धतीने प्रतिसाद दिला ते पाहून आजची युवा पिढी किती संवेदनशील आहे हेही जाणवले. या संमेलनात प्रकाशन विश्वातली तरुणाईही सहभागी झाली होती. त्यांनी आव्हाने आणि संधींची खोलवर चर्चा केली. 'असे घडलो आम्ही' या सदरात अनेक मान्यवरांनी आपली जडणघडण सांगितली. तरुण मुलांनी त्यांच्या स्वप्नातला समर्थ भारत उभा केला. कविसंमेलनात मुलांनी ज्या कविता सादर केल्या त्यात मोबाईलपासून फेसबुकपर्यंत आणि अण्णांच्या आंदोलनापासून सवाई गंधर्व महोत्सवापर्यंत अनेक विषय होते. तरुणाईच्या बाबतीत निराश होण्याचे कारण नाही असेच या संमेलनाने दाखवून दिले.

युवकांपर्यंत पोचलेल्या साहित्य परिषदेने आता आपले लक्ष बालकांवर केंद्रित केले आहे. वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत मुलांच्या मनाच्या कोऱ्या पाटीवर जे छापले जाते ते आयुष्यभर पुसता येत नाही. याच वयात त्यांच्या मनात साहित्य, भाषा आणि शब्दप्रेम निर्माण करता आले तर ही मुले भावनिकदृष्ट्या समृद्ध होतील याचा विचार करून साहित्य परिषदेने 'बाल मंचा'ची स्थापना केली आहे. सुटीच्या काळात मुले कवितांचा आनंद घेतात. परिषदेतर्फे लवकरच आजी-आजोबांच्या गोष्टी हा कार्यक्रम मुलांसाठी सुरू करणार आहोत. ज्येष्ठ साहित्यिक असणारे आजी-आजोबा मुलांना गोष्टींच्या दुनियेत घेऊन जातील. योग्य वयात चांगल्या गोष्टी त्यांच्या कानावर पडाव्यात आणि श्रवणाच्या माध्यमातून त्यांच्या भावनांचे भरणपोषण व्हावे, यासाठी हा प्रयत्न करणार आहोत.

साहित्य परिषदेचा आणखी एक महत्त्वाचा उपक्रम आणि ज्याला वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभतो आहे तो म्हणजे 'कॉफीक्लब'. लेखक, कवी, कलावंत आणि वेगळ्या वाटांनी जाणाऱ्या माणसांविषयी सर्वांनाच कुतूहल असते. त्यांना भेटण्याची आणि त्यांच्याशी संवाद साधण्याची सर्वांनाच इच्छा असते. पण या लोकांच्या व्यग्र दिनचर्येमुळे किंवा वाचकांच्या भिडस्त स्वभावामुळे अनेकदा असा योग येत नाही. 'कॉफीक्लब'द्वारे साहित्यपरिषदेने हा योग जुळवून आणला आहे. इथे व्यासपीठ आणि श्रोते असा भेद नसतो. अनौपचारिक गप्पा असेच याचे स्वरूप असते. श्रोत्यांना आपल्या मनात असणारे प्रश्न या मान्यवरांना विचारता येतात. खूप मोठ्या माणसांना जवळून पाहण्याची आणि त्यांच्याशी बोलण्याची संधी या कार्यक्रमामुळे अनेक श्रोत्यांना लाभते. कॉफीक्लबला मिळणारा प्रतिसाद दिवसेंदिवस वाढतो आहे. अनौपचारिक गप्पांसाठी असा एखादा कट्टा असावा, ही कल्पना शांताबाई शेळकेंची. त्या कल्पनेला परिषदेने मूर्त रूप दिले आहे.

परिषदेचा आणखी एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे 'नवं कोरं'. आजकाल अनेक पुस्तके प्रकाशित होतात. प्रकाशनाचे समारंभ होतात. हे प्रकाशन समारंभ ठोकळेबाज पद्धतीने होताना दिसतात. त्यात वाचकांना तो लेखक त्या पुस्तकाच्या निमित्ताने जाणून घ्यायचा असतो, लेखकालाही त्या पुस्तकाची निर्मितिप्रक्रिया सांगायची असते. पण समारंभाच्या आणि वेळेच्या चौकटीमुळे अनेकदा हे शक्य होत नाही. त्यामुळे लेखकाला आपली

। अभिनंदन... ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर - जीवनसाधना गौरव पुरस्कार ।
प्रायोजक – श्री. चिंतामणी बने, डोंबिवली

भूमिका मांडता यावी, त्या पुस्तकावर सखोल चर्चा व्हावी, त्यात वाचकांना सहभागी करून घ्यावे या उद्‌देशाने ‘नवं कोरं’ हा वेगळ्या विषयांवरच्या पुस्तकांसाठीचा उपक्रम सुरू केला. त्यालाही उत्तम प्रतिसाद मिळतो आहे.

साहित्य संमेलनाच्या उत्सवी वातावरणात गांभीर्याने चर्चा होत नाही असे मत काही बुजूर्ग लोकांनी व्यक्त केले आहे. त्यात काही प्रमाणात तथ्यही आहे. एखादी साहित्यकृती जेव्हा निर्माण होते तेव्हा तिची मौलिकता, त्या साहित्यकृतीचे मूल्यमापन करून समीक्षक मंडळी सांगत असतात. लेखक, वाचक, प्रकाशक, ग्रंथविक्रेता यांच्या इतकेच समीक्षक साहित्य व्यवहारात महत्त्वाची भूमिका बजावत असतात. वाचकांना त्या साहित्यकृतीकडे पाहण्याची दृष्टी समीक्षक देत असतात. त्यामुळे यावर्षीपासून समीक्षकांचे संमेलन साहित्यपरिषदेतर्फे मे महिन्यात घेण्यात येणार आहे.

जागतिकीकरण, खुली अर्थव्यवस्था आणि उदारीकरणाचे जीवनाच्या सर्व क्षेत्रावर दूरगामी परिणाम होत आहेत. जगण्याचा तीव्र झालेला संघर्ष साहित्यातूनही तेवढ्याच प्रभावीपणे पुढे येत आहे. नव्यातले अगदी नवे आणि जुन्यातले टिकाऊ बरोबर घेऊन पुढे जाण्याची

मानसिकता साहित्य परिषदेने स्वीकारलेली आहे.

तंत्रज्ञानाचे महत्त्व कुणीही नाकारलेले नाही. पण तंत्रज्ञानाच्या आहारी जाऊन आपल्याला केवळ यंत्रमानव घडवायचे नाहीत. ज्यांच्या डोळ्यात अश्रू येऊ शकतात अशीच माणसे समाजाचे अश्रू पुसण्याचे काम करू शकतात. तंत्रज्ञानाच्या जोडीला जगण्याचे तत्त्वज्ञान असावे, असाच आग्रह परिषदेसारख्या संस्थांचा आहे.

♣ ♣

– प्रा. मिलिंद जोशी
प्रमुख कार्यवाह, महाराष्ट्र साहित्य परिषद
टिळक रस्ता, सदाशिव पेठ, पुणे ३०
अवश्य भेट द्या–www.masapapune.org

चित्रकार परिचय

नाव : कुडल हिरेमठ
जन्म : २१ जुलै १९८२, बेळगाव
शैक्षणिक पात्रता : जी.डी. आर्ट (कमर्शिअल आर्ट) २००६; अभिनव कला महाविद्यालय, पुणे.



सौर माघ (फेब्रुवारी २०१२) अंकावरील हत्ती आणि मुलगी हे चित्र आठवतंय ना? कुडल हिरेमठ या चित्रकाराचं ते चित्र जलरंगातलं होतं.

वडील महंतय्या हिरेमठ ज्येष्ठ चित्रकार. त्यांच्यामुळे कुडल हिरेमठ यांच्या मनात चित्रकलेची आवड निर्माण झाली. निसर्गचित्रण, वस्तुचित्रण आणि मानवाकृती चित्रित करणे हे हिरेमठ यांचे खास आवडीचे विषय आहेत. जलरंग माध्यमात वेगवेगळी दृश्य चित्रित करणं, मानवाकृती उभ्या करणं ही त्यांची खासियत आहे. ‘रेस’ या गावाकडच्या जत्रेतील शर्यतीविषयीच्या त्यांच्या चित्रमालिकेचे प्रदर्शन नुकतेच पुण्यात भरले होते. बैल, घोडे यांच्यातल्या शर्यतीच्या वेळचे दिमाखदार, प्रवाही चित्रण त्यांच्या चित्रातून प्रतीत होत होते.

वैयक्तिक आणि गटात मिळून त्यांची महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेर मिळून सुमारे २० चित्रप्रदर्शनं भरली आहेत. प्रादेशिक संस्कृतीचा आणि तेथील चित्रशैलीचा अभ्यास करण्यासाठी हिरेमठ भूतान आणि अरुणाचल प्रदेशामध्ये जाऊन आले आहेत. अनेक पारितोषिकंही त्यांना मिळाली आहेत.

२२/२२४ आपटे कॉलनी, हिंगणे (खु.), सिंहगड रस्ता, पुणे ५१, kudal_hiremath@rediffmail.com

चेहरा उन्हाचा लेऊन खंतावली सांज ।
थोडा शिडकावा तरी व्हावा म्हणे आज ।।

२ ‘क्लिक’ करण्यापूर्वी

मित्र हो, फोटोग्राफी हा छाया प्रकाशाचा खेळ आहे. यामध्ये प्रतिमा तयार होण्यासाठी प्रकाश आवश्यक आहेच, परंतु त्याहूनही प्रकाशाचा महत्त्वाचा उपयोग चित्रामध्ये योग्य ते वातावरण निर्मिती करण्यासाठी होतो. सूर्योदयाची प्रसन्न-आल्हाददायक वेळ, समुद्र किनाऱ्यावरची शांतता, दूरवर दिसणारे विस्तीर्ण क्षितिज, आणि समोर अथांग पसरलेल्या सागराची धीरगंभीर गाज! शांत होण्यासाठी, अंतर्मुख होण्यासाठी, ध्यान करण्यासाठी कुणालाही प्रेमात पाडेल असेच वातावरण, हो ना? आणि हेच शांत-प्रसन्न वातावरण नेमकेपणाने कॅमेऱ्याबद्ध करण्यात छायाचित्रकाराला यश आले आहे.

या चित्रामध्ये कॅमेऱ्याच्या समोरून प्रकाश येतो आहे आणि या फोटोतील व्यक्ती पाठमोरी आहे. कारण या फोटोत ती व्यक्ती महत्त्वाची नाही. तर फोटोत निर्माण झालेले वातावरण जास्त परिणामकारक आहे. अशा चित्रांना सिलहॉऊट (Sillhoute) असे म्हणतात. हे फोटोग्राफीमधील एक वैशिष्ट्यपूर्ण तंत्र आहे.

सौर माघ अंकातल्या फोटोतील आजीबाईंचे हात हे फोटोच्या डाव्या भागात होते. पुढची घटना (आजी देवळात प्रवेश करणार आहेत हे) दाखवायला त्यात जागा राखून ठेवली होती. या फोटोत मात्र ध्यान करणारा माणूस फोटोच्या मध्यभागी आहे. भविष्यात घडणाऱ्या किंवा भूतकाळात घडून गेलेल्या कोणत्याही घटना महत्त्वाच्या नसून आत्ता ध्यानासाठी बसलेली व्यक्ती आणि ते वातावरण यालाच महत्त्व आहे.

प्रकाशामुळे आपण चित्रामध्ये विविध भावना, मूड्स् निर्माण करू शकतो. एखाद्या प्रसंगातून निर्माण होणारा आनंद, उत्साह, खिन्नपणा इत्यादी दाखवण्यासाठी प्रकाश योजनेचा वापर करता येतो. नैसर्गिक प्रकाशाचा वापरदेखील योग्यप्रकारे करून आपण हे साध्य करू शकतो.

तुमच्या ‘एक से एक’ फोटोंची आणि तुमच्या ‘हटके’ शंका-प्रश्नांची मी वाट पाहातोय, लक्षात आहे ना? मला मेल करताना किंवा पत्र लिहिताना आपल्या या ‘क्लिक करण्यापूर्वी’ चा संदर्भ द्यायला मात्र विसरू नका हं !

– राजेंद्र महामुनी, फोटोग्राफी विभाग, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे- ४, rmahamuni@yahoo.co.in

...वाचाल तर वाचाल...

मंगेश पाडगावकर या सुप्रसिद्ध कवींचं नाव, त्यांच्या कविता तुम्ही वाचलेल्या असतील याची मला खात्री आहे. त्यांची बालगीते, ‘बोलगाणी’तली गाणी तुम्हाला आवडली असतीलच.

त्यांची *‘सांगा कसं जगायचं? कण्हत कण्हत की गाणं म्हणत?’* ही जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगणारी कविता तुम्ही जरूर वाचलेली असली पाहिजे. आपलं आपल्याला अंतर्मुख करणारी अशी ही कविता मला – विशेष प्रिय आहे. तुम्हाला त्यांची सर्वात जास्त आवडणारी कविता कोणती? शाळेच्या ग्रंथालयात जाऊन त्यांचे कवितासंग्रह तुम्ही जरूर बघायला हवेत.

अशा आपल्या लाडक्या कवींचा वाढदिवस १० मार्चला (जन्म दि. १०-३-२९) आहे. त्यांना आपण भरभरून शुभेच्छा देऊया अन् आपल्यासाठी खूप खूप लिहिण्याची मागणी करूया.

मंगेश पाडगावकर एका कवितेत ग्रंथवाचनाचं महत्त्व विशद करतात. ते सांगतात–

‘ग्रंथ आमुचे हाती ग्रंथ आमुचे साथी
ग्रंथ उजळती अज्ञानाच्या अंधाराच्या राती’

अज्ञानाचा/अडाणीपणाचा अंधार दूर करणाऱ्या, तिमिरातुनी तेजाकडे नेणाऱ्या, आपल्याला अनुभवसंपन्न करणाऱ्या या पुस्तकाचे महत्त्व अबाधित आहे. त्यामुळे तुम्ही सगळ्यांनीही प्रसंगी अखंडीत वाचीत जावे !

- दत्ता टोळ

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ११ फाल्गुन, शके १९३३, १ मार्च २०१२ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे-२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० येथून प्रसिद्ध केले.

भारतमाता एकच दैवत

स्वामी विवेकानंद
शतकोत्तर सुवर्णजयंतीनिमित्त
त्यांच्या विचारांवर आधारित
गीतमाला – ३

भारतामाता एकच दैवत येत्या दिवसांचे
इतर देव हे नाममात्र अन् केवळ नवसांचे
... असे हे शब्द नरेंद्राचे ।। ध्रु. ।।

युगयुग अपुल्या भरणपोषणा
असुरांपासुन नित्य रक्षणा
या मातेचे आशीर्वादच अपुल्या हक्काचे ।। १ ।।

खरे, स्वयंभू, जागृत, पावन
दैवत हे तर अपुले आपण
नाहि दुरावा, द्वैत न उरले देवाभक्तांचे ।। २ ।।

या देशातील हे नारीनर
सन्मानाने जगावेत जर
आपसातले विसरू भांडण अनंत शतकांचे ।। ३ ।।

कसले उत्सव, कसल्या यात्रा
दैन्य जोवरी, अन्न न पात्रा
वेदान्ताशी जोडू विक्रम, ध्येय भारताचे ।। ४ ।।

स्मरुनी केवळ ते गतवैभव
लोपत नाही दरिद्र वास्तव
यत्न हवे आनंद लाभण्या, बोल विवेकाचे ।। ५ ।।

शिकागोच्या सर्वधर्मपरिषदेत हिंदुधर्माचे प्रभावी प्रतिनिधित्व करणाऱ्या विवेकानंदांचे 'धर्म'विषयक विचार अतिशय व्यापक होते. 'अंधश्रद्धेने नवससायास न करता, भारतमाता हेच आपले दैवत मानावे. जोपर्यंत येथील अज्ञान, दारिद्र्य दूर होत नाही तोपर्यंत देवतांचे उत्सव, यात्रा साजऱ्या करून, केवळ गतवैभवाचे स्मरण करून काहीही होणार नाही. त्यासाठी आपापसातील भांडण, भेदाभेद विसरून आपण एकत्र यायला हवं; प्रयत्नांच्या बळावर देश सुजलाम्, सुफलाम् बनावा हे स्वप्न पाहायला हवं. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, विज्ञाननिष्ठा यांचा पाठपुरावा करत अध्यात्माला पराक्रमाची जोड द्यायला हवी. तरच येथे 'आनंदलोक' अवतरेल, देशाला पूर्वीचे वैभव प्राप्त होईल', हे विचार स्वामीजींनी स्पष्ट शब्दात मांडले आहेत. या कवितेत कवीने प्रत्येक स्वतंत्र विचार स्मरताना 'असे हे शब्द नरेंद्राचे' हे पालुपद अतिशय प्रभावीपणे वापरले आहे. स्वामीजींनी सुमारे १०० वर्षापूर्वी मांडलेले विचार आपल्या देशाची आजची स्थिती बघता आचरणात आणायला हवेत असे वाटते.

स्वामी विवेकानंदांचे विचार आचरणात आणूया !... ३

जोपर्यंत स्त्रियांची स्थिती सुधारत नाही तोपर्यंत जगाचे कल्याण होणे शक्य नाही.
पक्षी कधी एका पंखाने उडू शकत नाही.

- घरातील आई/आजी यांना फुरसतीचा वेळ मिळावा, यासाठी त्यांचे एक काम मी आवर्जून नित्य करेन.
- घरात कामासाठी येणाऱ्या मावशींना / त्यांच्या मुलांना साक्षर/संगणक साक्षर करण्याचा मी जाणीवपूर्वक प्रयत्न करेन.

सौर फाल्गुन, शके १९३३/ मार्च २०१२, पंजीकृत नियतकालिक (Registered Newspaper)
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR/2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
L-2 / RNP / PNW/M / 94 / 2012 - 2014, **Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.**

'क्लिक' करण्यापूर्वी



(पान क्रमांक – ३२)

सौर दिनदर्शिका शके १९३३

	मार्च २०१२	फाल्गुन / चैत्र
गु.	1	११
शु.	2	१२
श.	3	१३
र.	4	१४
सो.	5	१५
मं.	6	१६
बु.	7	१७
गु.	8	१८
शु.	9	१९
श.	10	२०
र.	11	२१
सो.	12	२२
मं.	13	२३
बु.	14	२४
गु.	15	२५
शु.	16	२६
श.	17	२७
र.	18	२८
सो.	19	२९
मं.	20	३०
बु.	21	चै. १
गु.	22	२
शु.	23	३
श.	24	४
र.	25	५
सो.	26	६
मं.	27	७
बु.	28	८
गु.	29	९
शु.	30	१०
श.	31	११

पत्त्यामध्ये वर्गणीचा कालावधी 12-6/Mar. 12 असल्यास तुमची वर्गणी संपली आहे, ती त्वरीत भरावी. पत्त्यामध्ये चुका असल्यास तातडीने कळवा.

संपर्क पत्ता :
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
या अंकाची किंमत : ₹ १५/–
वार्षिक वर्गणी : ₹ १८०/–
प्रकाशन दिनांक :
सौर ११ फाल्गुन, शके १९३३
१ मार्च २०१२
www.chhatraprabodhan.org
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा–संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति –